रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८७ । अंक ३४५ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

### जरांगेंचा सरकारला ६ जूनपर्यंतचा अल्टिमेटम

**जालना :** ४ जूनला आंतरवली सराटीतून आम्ही उपोषण सुरु करणार आहोत. कोण पडलं, कोण निवडून आलं याचा आम्हाला आनंद नाही. आरक्षणाचा गुलाल आमच्यासाठी आमचा आनंद आहे. ४ जूनची तारीख आम्ही साडेतीन महिन्यांपूर्वी जाहीर केली आहे. त्यात कुठलाही बदल होणार नाही. आमचं शांततेचं युद्ध आहे. त्याच मार्गाने आंदोलन करणार आहोत. आता सगळा मराठा एकवटला आहे. ६ जून पर्यंत सरकारने आरक्षण द्यावं ते झालं नाही तर आंदोलन बंद करणार नाही, असा इशारा मनोज जरांगेंनी दिला आहे.


# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. २२ मे २०२४

किंमत ४ ₹


### बच्चू कडूंचा महायुतीला घरचा आहेर

**अमरावती :** लोकसभा निवडणुकीत महायुतीला भरघोस यश मिळणार नाही. महायुतीला ज्याप्रमाणे वाटतं की आपला रोठ्या मताधिक्याने विजय होऊन भरघोस यश मिळेल, मात्र सध्या राज्यात तशी काही परिस्थिती राहिली नाही. लोकांच्या मनात काही प्रमाणात ज्या नाराजी आहे, त्या उघडपणे दिसून आलेल्या आहेत. ही निवडणूक दोन्ही पक्षानी जाती आणि धर्मिकतेवर लढवलेली आहे. नेमका निकाल कोणत्या बाजूने लागेल हे सध्या तरी सांगता येत नाही, मतदार सुज्ञ आहे. ते ठरवतील असे सांगत आमदार बच्चू कडूंनी महायुतीला घरचा आहेर दिला आहे.

**रायगडचा बारावीचा निकाल 94.83%**

# यंदाही मुलींची सरशी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता बारावीचा ऑनलाईन निकाल मंगळवारी (दि.२१) दुपारी एक वाजता जाहीर झाला. रायगड जिल्ह्याचा निकाल ९४.८३ टक्के इतका लागला आहे. या परीक्षेत ९७.०१ टक्के मुली व ९२.७१ टक्के मुले उतीर्ण झाले आहेत. यंदाही या निकालात मुलींनी बाजी मारली आहे. मात्र गतवर्षीच्या तुलनेने यावर्षी निकालाच्या प्रमाणात दोन टक्क्यांनी वाढ झाली आहे.

फेब्रुवारी - मार्चमध्ये बारावीची परीक्षा घेण्यात आली. रायगड जिल्ह्यातील हजारो विद्यार्थी या परीक्षेला बसले होते. मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात परीक्षा संपल्यावर निकालाची प्रतीक्षा लागून राहिली होती. परीक्षेचा निकाल कधी जाहीर होणार याकडे लक्ष



लागून राहिले होते. अखेर ही उत्कंठा संपली. मंगळवारी दुपारी एक वाजता बारावीच्या परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झाला. काही विद्यार्थ्यांनी मोबाईलवरून तर काहींनी सायबर कॅफेमध्ये जाऊन बारावीचा निकाल पाहिला. काही सायबर कॅफेमध्ये गर्दी झाली होती.

उतीर्ण झाल्यावर अनेकांनी आनंदोत्सव साजरा केला. परीक्षेत उतीर्ण झाल्यावर सोशल मिडीयावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. रायगड जिल्ह्यात बारावीच्या परीक्षेत २९ हजार ३४६ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी २७ हजार ८३१ विद्यार्थी उतीर्ण झाले. त्यात १४ हजार ५३ मुली व १३ हजार ७७८ मुलांचा समावेश आहे. जिल्ह्याचा निकाल ९४.८३ टक्के लागला आहे. त्यात मुले ९२.७१ टक्के व मुली ९७.०१ टक्के उतीर्ण झाले.यंदादेखील मुलांपेक्षा मुलींनी निकालात बाजी मारली आहे. जे विद्यार्थी बारावी परिक्षेत उत्तीर्ण झाले आहेत, त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा. तर ज्या विद्यार्थ्यांना परीक्षेत यश मिळाले नाही, अशा विद्यार्थ्यांनी खचून पान २ वर

> रायगड जिल्ह्यातील बारावीच्या परीक्षेचा निकाल समाधानकारक लागला आहे. जिल्ह्यातील मुलींनी चांगली टक्केवारी काढून जिल्ह्याचे नावलौकिक केले आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही मुली बारावीच्या परीक्षेत सरशी ठरल्या आहेत. उतीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा. जे विद्यार्थी अनुतीर्ण झाले आहेत, त्यांनी खचून न जाता पुन्हा अभ्यास करून परीक्षेत उतीर्ण होण्याचा प्रयत्न करावा. या विद्यार्थ्यांनादेखील पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.
>
> – पंडित पाटील, माजी आमदार

### पीएनपी महाविद्यालयाचा ९९ टक्के निकाल

पीएनपी एज्युकेशन सोसायटीचा आर्ट्स, कॉमर्स व सायन्स वेश्वी-गोंधळपाडा बारावीचा निकाल ९९ टक्के लागला असून संस्थेमधून सायन्समधील सिया राजेश अग्रवाल ८८.६७ टक्के गुण मिळवून प्रथम, हर्षाली संदीप नागावकर ८३.६७ टक्के गुण मिळवून द्वितीय तर भाव्य जैन ८०.१७ टक्के गुण मिळवून संस्थेत तृतीय आलेली आहे. (सविस्तर वृत्त ३ वर)

### ७६.२५ टक्के पुर्नपरिक्षार्थी उत्तीर्ण

रायगड जिल्ह्यातील २ हजार ६६७ पुर्नपरिक्षार्थी विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी अर्ज दाखल केले होते. यामधील २ हजार ६३२ विद्यार्थी परीक्षेला सामेरे गेले. त्यापैकी २ हजार ७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, ६२५ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत. पुर्नपरिक्षार्थी उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ७६.२५ टक्के इतके आहे.

### राज्यात एकमेव विद्यार्थिनीला १०० टक्के गुण

छत्रपती संभाजीनगर विभागातील एका विद्यार्थिनीला १०० टक्के गुण मिळाले आहेत.



१०० टक्के गुण मिळवलेली ही राज्यातील एकमेव विद्यार्थिनी आहे. या विद्यार्थिनीला प्रत्यक्ष परीक्षेत ५८२ आणि क्रीडा गुण १८ असे एकूण ६०० पैकी ६०० गुण मिळाले आहेत, अशी माहिती राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दिली. गोसावी म्हणाले, वाणिज्य शाखेच्या विद्यार्थिनीने १०० टक्के गुण मिळवणे कौतुकास्पद आहे. खेळात केलेली मेहनत आणि अभ्यासातील सातत्य याचा परिणाम तिच्या निकालात दिसत आहे.

## राज्याचा बारावीचा निकाल ९३.३७ टक्के

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. यंदा बारावीचा निकाल ९३.३७ टक्के लागला आहे.

सर्वाधिक ९७.५१ टक्के निकाल कोकण विभागाचा, तर मुंबई विभागाचा सर्वांत कमी ९१.९५ टक्के निकाल लागला. राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत निकाल जाहीर केला. मंडळाच्या सचिव अनुराधा ओक, माणिक बांगर या वेळी उपस्थित होते.

यंदा बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २३ मार्चदरम्यान घेण्यात आली. यंदा राज्यातील १५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यात विज्ञान शाखेसाठी सर्वाधिक सात लाख ६० हजार ४६ विद्यार्थी, कला शाखेसाठी तीन लाख ८१ हजार ९८२, वाणिज्य शाखेसाठी तीन लाख २९ हजार ९०५, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ३७ हजार २२६, आयटीआयसाठी चार हजार ७५० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. राज्यातील ३ हजार ३२० केंद्रांवर परीक्षा घेण्यात आली.यंदाच्या निकालात मुलांच्या तुलनेत मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण जास्त आहे. ९२.६० टक्के मुलगे, तर ९५.४९ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत, अशी माहिती शरद गोसावी यांनी दिली.

**नऊ विभागीय मंडळातील निकाल**

| | |
|---|---|
| पुणे | ९४.४४% |
| नागपूर | ९२.१२% |
| छत्रपती संभाजीनगर | ९४.०८% |
| मुंबई | ९१.९५% |
| कोल्हापूर | ९४.२४% |
| अमरावती | ९३.००% |
| नाशिक | ९४.७१% |
| लातूर | ९२.३६% |
| कोकण | ९७.५१% |

**आजचा अग्रलेख**

**पुण्यातील खून**

**वे|ध|क**

### पाय घसरुन तरुण दरीत कोसळला

**नेरळ :** माथेरान येथील स्थानिक तरुण खोल दरीत कोसळून गंभीर जखमी झाला आहे. भूषण शिंदे असे या तरुणाचे नाव असून, माथेरानच्या खंडाळा पॉईंट येथील २०० फूट खोल दरीत भूषणचा पाय घसरून पडला होता.दरम्यान, जखमी अवस्थेत असलेल्या भूषणला माथेरान सह्याद्री रेस्क्यू टीमने अथक प्रयत्न करून सुखरूप बाहेर काढल्याने त्याचे प्राण वाचले आहे. भूषणला पनवेल एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले आहे. माथेरान शहरात छोटेखानी व्यवसाय करून भूषण आपल्या कुटूंबाचा आधार बनला. माथेरान कपाडिया मार्केट येथील आपले दुकान बंद करून रविवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास भूषण आणि त्याचा मित्र दोघे खंडाळा पॉईंट येथे नेहमीप्रमाणे फेरफटका मारण्यासाठी गेले होते. दरम्यान, खोल दरीच्या पायवाटेवरील निसरड्या रस्त्यावर भूषणचा पाय घसरून २०० फूट खोल दरीत कोसळल्याने तो जखमी झाला होता. भूषणच्या मोबाईलवर आलेला फोन कॉल आणि त्याला वेळेत मिळालेली माथेरान सह्याद्री रेस्क्यू टीमची मदत ही त्याच्यासाठी जीवदान देणारी ठरली. पोलीस आणि रेस्क्यू टीमने भूषणला दरीतून सुखरूप बाहेर काढले. त्याच्या हातापायाला, डोक्याला आणि कंबरेला जखमा झाल्या होत्या. सुदैवाने दैव बलवत्तर म्हणून या भीषण दुर्घटनेतून भूषण बालबाल बचावला.

## २३,२४ मे रोजी किल्ले रायगडावरील पायवाट बंद

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड किल्ल्यावर महादरवाजाच्या खालील बाजूस असलेल्या उंच कड्यावरील मोकळे दगड काढून घेण्याकरीता दुर्गवीर प्रतिष्ठान मुंबई यांनी सहमती दर्शविली असून हे काम तातडीने करण्यात येणार आहे. याकरिता किल्ले रायगडावर जाणाऱ्या पायरीमार्गावर संभाव्य दरड आपत्ती सौम्यीकरण उपाययोजनांच्या अनुषंगाने २३ व २४ मे रोजी किल्ले रायगडावरील पायवाट बंदचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केले आहेत.

किल्ले रायगडावर यावर्षी ३५१ वा शिवराज्याभिषेक सोहळा तारखेनुसार ०६ जून व तिथीनुसार २० जून रोजी साजरा करण्यात येणार आहे. या सोहळ्याकरीता



**जिल्हाधिकारी जावळे यांनी केले आदेश जारी**

नागरिक आणि अतिमहत्वाच्या व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. यावर्षीच्या कार्यक्रमाच्या अगोदर महादरवाजाच्या खालील बाजूस असलेल्या उंच कड्यावरील मोकळे दगड काढून घेणे आवश्यक आहे. या ठिकाणी असलेला कडा हा अतिउंच असल्याने केवळ प्रशिक्षित रॅपलर्सच्या मदतीने मोकळे दगड काढणे शक्य आहे. पान २ वर

**रिलायन्स कंपनीत ठेकेदारीवरुन**

## दोन गटात तुंबळ हाणामारी

- **तलवारीने मानेवर वार केल्याने एकजण जखमी**
- **दोन्ही गटांतील आठ जणांना तात्काळ अटक**

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठण्याजवळील रिलायन्स कंपनीत कामगार पुरविणे तसेच ठेकेदारी पद्धतीने कामे करणे यावरून नागोठणे पोलीस ठाणे हद्दीतील शिहू-मुंढाणी (ता. पेण) परिसरात राहणाऱ्या दोन गटात वाद झाला. ही घटना सोमवारी (दि. २०) रात्री ११.४५ वाजण्याच्या सुमारास मुंढाणी फाटा येथे घडली. यावेळी दोन गटात झालेल्या तुंबळ हाणामारी झाली. दरम्यान, धारदार तलवारीने मानेवर वार केल्याने एकजण गंभीर जखमी झाला, तर दुसऱ्या एकाच्या या हाणामारीत हाताला गंभीर स्वरूपाची दुखापत झाल्याने फ्रॅक्चर झाला आहे. यासंदर्भात नागोठणे पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले असून, यातील दोन्ही गटांतील आठ जणांना नागोठणे पोलिसांकडून तात्काळ अटक करण्यात आली.

नागोठणेजवळील रिलायन्स इंडस्ट्रीज कंपनीत शिहू-मुंढाणी परिसरात राहणाऱ्या यातील फिर्यादी व आरोपी यांचे कॉन्ट्रॅक्ट असून, यांच्यात मुंढाणी फाटा शिहू या ठिकाणी कंपनीत कामगार पुरविणे यावरून वाद निर्माण झाले. हा वाद इतका विकोपाला गेला की, त्याचे रुपांतर तुंबळ हाणामारीत झाले. यावेळी या हाणामारीत संकेत उर्फ संकेश शैलेश चोरगे (रा. बेणसे, ता. पेण) याच्या मानेवर तलवारीने वार केल्याने तो गंभीररित्या जखमी झाला असून, त्याला पेण येथील डॉ. म्हात्रे यांच्या खासगी रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. तर, दिपक कमलाकर घासे (रा. मुंढाणी, ता. पेण) याच्याही हाताला गंभीर स्वरूपाची दुखापत झाल्याने फ्रॅक्चर झाला असून, त्याला अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तर या तुंबळ हाणामारीत प्रसाद कुथे, पुंडलिक घासे, प्रवीण कुथे, रणधीर भोईर यांना पान २ वर

## आंबेनळी घाटामध्ये भूस्खलनाचा वाढता धोका

**दरडी कोसळण्याच्या घटना; आपत्तीपूर्वी घाटबंदीची गरज**



**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरून पोलादपूर, महाबळेश्वर, वाई, सुरूर मार्गावरील आंबेनळी घाटामध्ये २०२१मध्ये मोठया प्रमाणात भुस्खलनाच्या घटना अतिवृष्टीदरम्यान झाल्यानंतर सातारा जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाने महाबळेश्वर ते प्रतापगडदरम्यानच्या रस्त्याचे मजबुतीकरण आणि दरडप्रवण क्षेत्रातील बंदिस्ती व बांधकामांची पूर्तता केली आहे. मात्र, रायगड जिल्ह्यातील पोलादपूर सार्वजनिक बांधकाम उपविभागाने केलेल्या दरडप्रवण क्षेत्रातील कामांखेरीज अनेक ठिकाणी भूस्खलनाचा धोका दिसून येत असल्याने मोठ्या आपत्तीपूर्वी आंबेनळी घाट वाहतुकीस बंद ठेवण्याची गरज दिसून येत आहे. गेल्या सात दिवसातील अवकाळी पावसामुळे आंबेनळी पान २वर

## खंडाळा घाटात भीषण अपघात

**कंटेनर कारवर कलंडल्याने दोन ठार तर सहा जखमी**

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई पुणे जुन्या महामार्गावर खंडाळा राजमाची पॉईंट येथील बॅटरी हिलगावाजवळील तीव्र उताराच्या वळणावर कंटेनर कारवर कलंडल्याने भीषण अपघात घडला.या अपघातात कारमधील दोन जणांचा मृत्यू झाला तर सहा जण जखमी झाले आहेत.

जुन्या महामार्गावरून लोणावळा येथून मुंबईकडे कंटेनर जात असताना तो बॅटरी हिलजवळील तीव्र वळणावर आला असता लोणावळाकडे जाणाऱ्या कारवर कलंडला. ही कार अलिबागवरून तळेगाव येथे जात होती. या कारमध्ये तळेगाव येथील चौधरी कुटुंबातील आठ जण प्रवास





करत होते. यामध्ये कविता दत्तात्रय चौधरी आणि दत्तात्रय चौधरी या दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर योगेश चौधरी(वय ४०), जान्हवी योगेश चौधरी (वय ३१), दीपाशा योगेश चौधरी (वय ९), जिगीक्षा योगेश चौधरी (वय १.५), मितांश दत्तात्रय चौधरी (वय९), भूमिका दत्तात्रय चौधरी (वय१६) हे सहा जण किरकोळ जखमी झाले असून सर्व जखमींना जवळच्या खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

### माटवण येथे दगडाने मारहाण

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील माटवण मोहल्ल्यामध्ये एका वृध्दाने तरूणास शिवी दिल्याच्या रागातून तरूणाने रागाच्या भरात वृध्दाच्या डोक्यावर दगड मारून इजा केली. याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये तरूणाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माटवण उर्दू शाळेसमोर गुलाम मोहिद्दीन अलिमियाँ नाडकर या ६५ वर्षीय वृध्दाने अर्शद मोहमद सिद्दीकी नाडकर (३४) या तरूणास रंगावरून तसेच अश्लील शिव्या दिल्या. यावेळी अर्शद याने रागाच्या भरात गुलाम नाडकर याला रस्त्यावर पडलेला दगड फेकून मारला आणि दगड गुलाम नाडकर या वृध्दाला लागल्याने त्यास गंभीर स्वरूपाची दुखापत झाली.

### आमटेम-निगडेच्या खाडीत अवैध वाळू उत्खनन?



**। पेण । प्रतिनिधी ।**

आमटेम-निगडे खाडीत राजरोसपणे वाळू उत्खनन सुरू आहे. आमटेमच्या पुलाच्या दोन्ही बाजूला खाडीत सक्शन पंप आणि बोटी सर्रासपणे दिसून येतात. मात्र, सरकारी बाबू व खाकीवाल्यांना हे दिसतनाही, याबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे हे उत्तम प्रशासक म्हणून सर्वसामान्यांसमारे येत असताना आमटेम-निगडेच्या खाडीमध्ये सुरू असलेले अवैध वाळू उत्खनन बंद करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. सध्या जिल्हाधिकारी महसूल विभाग निवडणुकीच्या कामात व्यस्त असल्याचा फायदा वाळूमाफिया उठवत असल्याची चर्चा आहे.

आमटेम-निगडेच्या खाडीमध्ये सुरू असलेले अवैध वाळू उत्खनन तलाठी का बंद करू शकत नाही? अशा प्रकारची चर्चा पान २ वर

### पोलादपूरला तुफानी पाऊस

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

गेल्या आठवड्याच्या अखेरीस सलग तीन दिवस अवकाळी पावसाने हजेरी लावल्यानंतर तीन दिवसांची विश्रांती घेतली होती. आता पुन्हा अवकाळी सक्रिय झाला असून, पोलादपूर शहराच्या परिसरात तुफानी पाऊस सुरू झाल्याने वादळामुळे तसेच झाड कोसळून घरांचे अंशतः नुकसान झाले आहे. या पावसामुळे महावितरणच्या विद्युतवाहिनी तारा तुटल्याने वीजप्रवाह खंडित झाला, तर अनेक ठिकाणी घरांची कौले उडाली आहेत.

पोलादपूर तालुक्यात तीन दिवस सलग पावसाने हजेरी लावल्यानंतर आंबा बागायतदार शेतकऱ्यांचे नुकसान केले. मात्र, तीन दिवसानंतर अवकाळी पावसाने सलग तीन दिवस विश्रांती घेतल्याने पान २ वर

## आक्षी गावाचा शेकापवर विश्वास | चित्रलेखा पाटील यांचे प्रतिपादन

**। अलिबाग । शहर प्रतिनिधी ।**

अनेक गंभीर प्रश्न सोडविण्याची शेतकरी कामगार पक्षाची परंपरा आहे. ज्यावेळेला गावे वाड्यांमध्ये प्रश्न निर्माण होतात ते सोडविण्याचे काम शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांनी कायमच केले आहे. नारायण नागू पाटील, प्रभाकर पाटील, दत्ता पाटील यांच्यासारख्या अनेक दिग्गजांनी त्यावेळी जनतेचे प्रश्न सोडविले. आक्षी गावाचा शेकापवर विश्वास आहे, असे प्रतिपादन शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी केले. रायवाडी (आक्षी) गावातील मराठी शाळेजवळील सार्वजनिक विहिरीवर सोमवारी (दि.२०) पाणी शुद्धीकरण संयंत्राचे उद्घाटन चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या.



यावेळी मार्गदर्शन करताना चित्रलेखा पाटील म्हणाल्या, काळ बदलत गेला परस्थिती बदलत गेली, नवे नवे प्रश्न निर्माण होत गेले. वाढती लोकसंख्या, धरणांमधील कमी होणारी पाण्याची पातळी, वाढती उष्णता, प्रशासकीय सहकार्याचा अभाव अशा अनेक समस्यांमुळे पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. शेकापच्या पुरोगामी युवक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गावांतील पाण्याच्या प्रश्नासाठी धाव घेतली. पाणी शुध्दीकरण संयंत्र बसवण्याची मागणी केली. त्यानुसार पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. उमटे धरणातील पाण्याच्या प्रश्नाबाबत काहीजण मोठा निधी आणण्याच्या बाता मारतात. जाहीरात बाजी करून गाळ काढण्याचा दिखावा केला होतो. प्रत्यक्षात मात्र काम काही दिसून येत नाही. परंतु, शेतकरी कामगार पक्ष राजकारणापलिकडे जाऊन जनतेच्या हितासाठी धावणारा पक्ष आहे. गोरगरीबांशी बांधिलकी ठेवून काम करण्याची शिकवण या पक्षातून दिली गेली आहे. पान २ वर



**ग्रामस्थांच्या मागणीची दखल**

रायवाडी गावामध्ये उमटे धरणातून पाणी पुरवठा केला जात आहे. मात्र, तीन ते चार दिवस आड पाणी पुरवठा केला जात असल्याने गावांमध्ये पाण्याचा प्रश्न निर्माण झाला. पिण्यासाठी विकतचे पाणी आणावे लागत होते. त्यामुळे आर्थिक भुर्दंड बसत आहे. पाण्याची गंभीर परिस्थिती लक्षात घेत येथील शेकाप पुरोगामी युवक संघटनेचे कार्यकर्ते अभिजीत वाळंज, संतोष राऊळ, शक्ती बानकर, राजू बानकर यांनी शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांच्याकडे ही समस्या मांडली. चित्रलेखा पाटील यांच्यामुळे गावातील सार्वजनिक विहीरीवर पाणी शुद्धीकरण संयंत्र बसवण्यात आले. या कार्याबद्दल सर्व स्तरांतून शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील व युवा कार्यकत्यांचे आभार तसेच कौतुक केले जात आहे.

## कर्नाळ्यात होणार प्राणी गणना

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

दरवर्षी प्रमाणे यंदादेखील बुद्ध पौर्णिमेच्या रात्री कर्नाळा पक्षी अभय आरण्यात प्राणी गणना करण्यात येणार आहे. अनेक वर्षांपासून सुरु असलेल्या या प्रक्रियेला शास्त्रीय पुरावा नसल्याने आता या प्रक्रियेला निसर्ग अनुभव नाव देण्यात आले आहे.

या कार्यक्रमाकरीता अभयारण्यात तीन ठिकाणी पाणवठ्यावर मचाण तयार करण्यात आले आहेत. या ठिकाणी येणाऱ्या प्राण्यांचे फोटो कॅमेऱ्यात कैद करुन आणि पाऊलखुणांवरुन प्राण्यांच्या संख्येची गणना करण्यात येत असते. निसर्ग अनुभवाचा हा दिवस प्राणीप्रेमी आणि निसर्ग अभ्यासकांसाठी पर्वणीचा दिवस ठरत असल्याने देशभरातील अरण्यात आयोजित कार्यक्रमात असंख्य प्राणीप्रेमी आणि अभ्यासक भाग घेत असतात.



**दुपारपासूनच अधिकारी मंचाणावर**

कर्नाळा पक्षी अभयारण्यात ३ ठिकाणी तयार करण्यात आलेल्या प्रत्येक मचणावर दोन कर्मचारी बसणार असून, त्यांच्यासोबत प्राणी गणनेसाठी उपस्थित राहणाऱ्या वन्य प्रेमीना देखील बसण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.तर पाणवठ्याच्या ठिकाणी ट्रॅप कॅमेरे देखील बसवण्यात येणार आहेत. शुक्रवारी सकाळी ८ पर्यंत ही प्राणी गणना सुरु राहणार आहे.

कर्नाळा पक्षी अभयारण्यात निसर्ग अनुभवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याकरीता अभयारण्य परिसरातील कल्हे तसेच आपटा आशा तीन पाणवठ्याच्या ठिकाणी मंचान तयार करण्यात आले असून, या ठिकाणी तैनात वनविभागाच्या कर्मचाऱ्यांकडून ट्रॅप कॅमेऱ्याच्या सहाय्याने पाणवठ्यावर येणाऱ्या प्राण्यांची गणना करण्यात येणार असल्याची माहिती कर्नाळा पक्षी अभय आरण्याचे वनअधिकारी नारायण राठोड यांनी दिली आहे.

मुंबई-गोवा महामार्गावर पनवेल पासून हाकेच्या अंतरावर असलेल्या कर्नाळा पक्षी अभय आरण्यात विविध प्रजातीच्या वृक्षासोबत पशु पक्षांचे वास्तव्य आहे. बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी देशभरातील अभयारण्यातील प्राण्यांची गणना केली जात असल्याने कर्नाळा पान २ वर

# वीज,पाणी समस्यांबाबत ग्रामस्थ एकवटले

**| माथेरान| वार्ताहर |**

**मे महिन्यातील ऐन पर्यटन हंगामात माथेरान शहराचा वीज आणि पाणी पुरवठा वारंवार खंडित झाल्यामुळे येथील ग्रामस्थ येणारे पर्यटक यांना भयंकर मनस्ताप सहन करावा लागला.याबाबत शहरामधील ग्रामस्थांनी एकत्रित येऊन जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले.**



मागील आठवड्यात अवकाळी पावसाने माथेरान शहरामध्ये चांगलीच धांदल उडवली. यामध्ये वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा आणि त्यामुळे शहराचे कोलमडलेले पाणी नियोजन यामुळे सुप्रसिद्ध असे पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान मधील ग्रामस्थांसह येथे आलेल्या पर्यटकांना भयंकर त्रासाला सामोरे जावे लागले.वीज आणि पाणी या नागरिकांच्या मूलभूत गरजा आहेत. यासाठी माथेरान शहरातील स्थानिक व्यापारी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष राजेश चौधरी यांनी पुढाकार घेऊन सर्व पक्षीय लोकप्रतिनिधी, हॉटेल व्यवसायिक, सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी व सर्व ग्रामस्थांची एक विशेष बैठक श्रीराम चौक येथे आयोजित केली. सदर बैठकीत रायगड जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन वीज आणि पाणी यांच्या येथे वारंवार उद्भवणाऱ्या समस्यांबाबत आणि इथल्या परिस्थिती बाबत निवेदन देण्याचे ठरवले.यामध्ये एमजेपी च्या पाणी पंपिंग स्टेशनवर जनरेटर बसविण्याची मागणी सर्वानुमते घेण्यात आली.

सोमवारी २० मे रोजी माथेरान ग्रामस्थांच्या वतीने एक शिष्टमंडळ जिल्हाधिकारी यांच्या भेटीस जाऊन या बाबत निवेदन दिले. जिल्हाधिकारी यांच्याकडून देखील सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून पाणी पंपिंग स्टेशन ठिकाणी लवकरच जनरेटरची सुविधा उपलब्ध केली जाईल असे आश्वासन देण्यात आले. माथेरान मधील सर्व पक्षीय राजकीय मंडळींनी येथे एकत्रित येऊन हा प्रश्न मार्गी लावला. भविष्यात देखील वैयक्तिक राजकारण बाजूला ठेवून माथेरान शहराच्या विकासासाठी व कोणत्याही महत्वाच्या मागणीसाठी अशीच एकजूट कायम ठेवली तर माथेरानच्या अनेक समस्या मार्गी लागतील. तर माथेरान पर्यटनस्थळाला अजून नावलौकिक प्राप्त होईल. पर्यटनात वाढ होऊन अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील असे येथे ग्रामस्थांमधून बोलले जात आहे.तर माथेरान व्यापारी वेलफेअर असोसिएशनचे खजिनदार चंद्रकांत जाधव यांनी गावच्या विकासासाठी अशाच प्रकारे आपण येथे एकत्र येऊन सहकार्य करावे. व्यापारी संघटना देखील गावच्या विकासाकरिता सदैव तत्पर आहे, असे यावेळी सांगितले.

## वे|ध|क

### चालकाला मारहाण

**पनवेल :** बस चालकाला मारहाण करून शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी आजीवली येथील केवल रमेश माळी याच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शेखर मंडलिक हे नवी मुंबई परिवहन उपक्रम येथे चालक म्हणून काम करतात. ते तुर्भे डेपो येथून बस (एमएच ४३ बीपी ८१०५) ही प्रवासी बस घेऊन खोपोली येथे जात असताना अजीवली बस स्टॉप येथे रात्री आले. यावेळी ह्युंदाई कंपनीची गाडी (एमएच ४६ झेड ५५५६) वरील चालक केवल रमेश माळी याने तू पळसे फाटा येथे आला असता माझी गाडी का दाबली असे बोलून त्यांना शिवीगाळ करून हाताबुक्क्याने मारहाण केली. त्यावेळी माझी काही चुकी नाही असे बोलत असताना त्यांनी पुन्हा मारहाण केली

### दागिन्यांची चोरी

**पनवेल :** घरातील बेडरूम मधील कपाटात ठेवलेले दागिने चोराने चोरून नेल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पूजा मगर या कामोठे येथे राहतात. पती-पत्नी आयटी कंपनीत नोकरीला आहेत. त्या रात्री साडेआठच्या सुमारास घरातील बेडरूम मधील कपाट आवरण्यास गेले असता त्यांना तीन लाख २५ हजार रुपये किमतीचे गंठण, चेन, दोन अंगठ्या दिसल्या नाहीत. अज्ञाताने कपाटात ठेवलेले दागिने चोरून नेले. त्यावेळी माझी काही चुकी नाही असे बोलत असताना त्यांनी पुन्हा मारहाण केली व या भागात पुन्हा दिसल्यास मारेल अशी धमकी दिली.

# आदिवासी महिलांना कापडी पिशव्यांचे वाटप

## ■ रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट आणि जनसंवाद संयुक्त उपक्रम

**| महाड | वार्ताहर |**




पर्यावरण पूरक कापडी पिशव्या ग्राहकांना देवून जनजागृती व्हावी या उद्देशाने महाड शहरातील रानमेवा विक्रेत्या आदिवासी महिलांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट आणि जनसंवाद रुरल डेव्हलपमेंट अँड वेल्फेअर असोसिएशन तसेच महाड नगर पालिकेच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण पूरक कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

शहरांमध्ये जनजागृती करून देखील प्लास्टिक पिशव्यांचा वापर अद्याप थांबलेला नाही यामुळे प्लास्टिक पिशव्यांमुळे गटारे थांबली जात असून पर्यावरणास हानी पोहोचली जात आहे. यामुळे कापडी पिशव्यांबाबत जनजागृती बरोबरच त्या पिशव्यांचा वापर वाढला पाहिजे या दृष्टीने रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट आणि जनसंवाद रुरल डेव्हलपमेंट अँड वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने महाड बाजारपेठेत ज्या आदिवासी महिला रानमेवा विक्री करण्यासाठी येतात त्यांना ग्राहकांना देण्यासाठी कापडी पिशव्यांचे प्रायोगिक तत्त्वावर वाटप करण्यात आले आहे. हा कार्यक्रम महानगर परिषदेच्या प्रशासकीय भावनांमध्ये आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास महाड नगर परिषदेचे मुख्याधिकारी धनंजय कोळेकर, रायगड फोर्टच्या प्रेसिडेंट सपना शेठ, सचिव मनीषा नगरकर, जगदीश वर्तक, निलेश पवार, सचिव मिलिंद माने, उपाध्यक्ष चंद्रकांत कोकणे आदी पालिका अधिकारी आणि रोटरीचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सपना शेठ यांनी प्लास्टिक पिशवीचे दुष्परिणाम आणि पर्यावरणास होणारी हानी याबाबत आपले विचार व्यक्त करून कापडी पिशवी देण्यामागचा उद्देश स्पष्ट केला. तर मुख्याधिकारी धनंजय कोळेकर यांनी प्लास्टिक पिशव्या पर्यावरणास धोकादायक असून विक्रेत्यांनी प्लास्टिक पिशव्या ग्राहकांना देण्यापेक्षा कापडी पिशव्यांचा आग्रह केला पाहिजे असे सांगून नागरिकांनी देखील या उपक्रमात सहकार्य केले पाहिजे असे सांगितले.

## कार नेल्याप्रकरणी चौघांविरोधात गुन्हा

**पनवेल :** कार आणि पैसे घेऊन गेल्या प्रकरणी शेख साजेब आणि इतर तीन अनोळखी इसमाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. इरफान प्लास्टरवाला हे सेक्टर आर वन, करंजाडे येथे राहतात. १६ मे रोजी ते घरी असताना साजेब शेख यांनी ऑफिस भाड्याने पाहिजे असल्याचे सांगून कामोठे येथे बोलावले. पूर्वीच्या व्यवहारातील पैसे परत का करत नाही म्हणून त्याच्यासोबत असलेल्या तीन व्यक्ती यांच्याकडून धमकावून गाडीत बसवले आणि खारघर, सीवूड येथे हाताने मारहाण केली. व्हिडिओ काढून अकाउंटवरून ७५ हजार रुपये गुगल ट्रान्सफर केले तसेच रोख २४ हजार रुपये एटीएम मधून काढून घेतले. त्यानंतर प्लास्टर वाला यांच्याकडील चार चाकी वाहन एम एच ४८ एके १७९० हुंडाई क्रेटा हे वाहन घेऊन ते निघून गेले.

# साजगाव ग्रामपंचायतीची कौतुकास्पद कामगिरी

**| रसायनी | वार्ताहर|**




खालापूर तालुक्यातील साजगाव ग्रामपंचायतीने माझी वसुंधरा अभियानाअंतर्गत केलेल्या जनजागृतीची सर्वत्र चर्चा असून शासन दरबारीही ग्रामपंचायतीच्या कार्याची दखल घेण्यात आली आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने सार्वजनिक सण व उत्सवांच्या वेळी वायू प्रदुषण व ध्वनी प्रदुषण कमी करण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांमार्फत वक्तृत्व स्पर्धा, फटाके बंदीची शपथ घेऊन तसेच महिला बचत गटांमार्फत गावांमध्ये बॅनरमार्फत हरीत सण साजरे करुन जनजागृती करण्यात आली.

सण व उत्सवांच्या वेळी जलप्रदुषण कमी करण्यासाठी ग्रामपंचायतीमार्फत गणेशोत्सव दरम्यान निर्माण होणारा निर्माल्य जमा करुन त्याचे साजगाव येथे व्यवस्थापन करण्यात आले. यातून तयार होणारे कंपोस्ट खत अमृत रोपवाटीकेसाठी वापरण्यात आले. पाणीपुरवठा करणाऱ्या उद्भव विहिरीचा गाळ काढण्यात आला. स्वच्छता ,पाण्याचा काटकसरीने वापर , वृक्षलागवड अशाप्रकारचे प्रेरणादायी संदेश देणाऱ्या रांगोळीतून जनजागृती, बालसभा, महिलासभा व ग्रामसभामार्फत माझी वसुंधरा पंचतत्वांची जनजागती करण्यात आली. वृक्षसंवर्धनाकरिता ठिंबक सिंचन प्रणालीसाठी ७५ स्वदेशी वृक्षांची लागवड करण्यात आली.

पान १ वरुन

## यंदाही मुलींची सरशी

न जाता जोमाने अभ्यास करावा व पुढील परीक्षेत यश संपादित करावे. बारावी नंतर करिअरच्या दृष्टीने अनेक अभ्यासक्रम असून, विद्यार्थ्यांनी आपल्याला कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे आहे. त्या दृष्टीने पुढील शिक्षणाची दिशा ठरवावी, असे रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी सांगितले.

**जिल्ह्यातील निकालावर दृष्टीक्षेप**

| तालुके | मुले - | मुली - | एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|
| पनवेल | ९६.९८ | ९८.७२ | ९७.८२ |
| उरण | ८९.४१ | ९७.२८ | ९३.२२ |
| कर्जत | ९१.९७ | ९६.४७ | ९४.२० |
| खालापूर | ८५.६१ | ९४.९४ | ९०.३ |
| सुधागड | ८०.९५ | ८८.३२ | ८४.३८ |
| पेण | ८७.१० | ९४.३६ | ९०.९४ |
| अलिबाग | ९०.१७ | ९६.४२ | ९३.३२ |
| मुरूड | ८१.९४ | ९७.१४ | ९०.५२ |
| रोहा | ९३.८५ | ९६.५७ | ९५.२२ |
| माणगांव | ९७.१२ | ९९.२८ | ९८.२५ |
| तळा | ९५.९५ | १०० | ९७.८६ |
| श्रीवर्धन | ९४.३६ | ९७.५५ | ९५.९८ |
| म्हसळा | ९७.५६ | १०० | ९८.६८ |
| महाड | ८९.७७ | ९४.२५ | ९२.०३ |
| पोलादपूर | ८९.११ | ९१.७९ | ९०.३९ |
| एकूण - | ९२.७१ | ९७.०१ | ९४.८३ |

## २३,२४ मे रोजी किल्ले रायगडावरील पायवाट बंद

हे मोकळे दगड काढीत असताना पायरी मार्गावरून होणाऱ्या पर्यटकांची पायी वाटचाल बंद करणे आवश्यक आहे. जेणेकरून या ठिकाणी कोणतीही जीवितहानी होणार नाही. या कालावधीत पर्यटक, स्थानिक नागरिक पायवाटेने गड चढ-उतार होणार नाहीत याबाबत स्थानिक प्रशासनाने दक्षता घ्यावी, असेही आदेशात नमूद केले आहे.

## आक्षी गावाचा शेकापवर विश्वास

सामाजिक बांधिलकी जपत उमटे धरणातील ३००हून अधिक ट्रक गाळ तीन दिवसामध्ये काढण्यात यश आले आहे. प्रशांत नाईक यांचेदेखील यासाठी मोलाचे सहकार्य लाभले आहे. उमटे धरणावर अवलंबून असणाऱ्या ४४ गावांना मिळणाऱ्या पाण्याचा दर्जा नक्की सुधारेल, असा विश्वास यावेळी चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केला.

आक्षी गावाने कायम शेकापवर विश्वास ठेवला आहे. रायवाडी गावात पाणी शुध्दीकरणाचे संयंत्र बसविण्याची संधी येथील शेकापच्या युवा कार्यकर्त्यांमुळेच मिळाली आहे. त्यांनी वेळोवेळी गावासाठी पाठपुरावा केला आणि त्यांच्या प्रयत्नांना आज यश आले असून अभिजीत वाळंज आणि सर्व पुरोगामी युवक संघटनेचे चित्रलेखा पाटील यांनी विशेष कौतुक केले. यावेळी शेकाप जेष्ठ कार्यकर्ते द्वारकानाथ नाईक, सरपंच रश्मी पाटील, उपसरपंच आनंद बुरांडे, सदस्य रश्मी वाळंज, माजी सरपंच नंदकुमार वाळंज, शेकाप पुरोगामी युवक संघटनेचे कार्यकर्ते अभिजीत वाळंज, संतोष राऊळ, शक्ती बानकर, राजू बानकर, प्रणित गुरव, विलास राणे, रश्मिन गुरव, रविंद्र पाटील, सुनिल नाईक, सुमीत कवळे, उल्हास भाटे, किशोर पेरेकर, शिवनाथ पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेकाप तुमच्या पाठीशी कायम उभे : द्वारकानाथ नाईक

आज पाणी ही काळाची गरज आहे. पाण्याच्या बाबतीत बोलायचं झालं तर पुर्वी उमट्याचे पाणी येत होते. कालांतरनाने तेही पाणी येणं बंद झालं. त्यानंतर एमआयडीसी आली. पण त्याचेही पाणी प्रत्येक गावात पोहचू शकले नाही. आज आपण जे पाणी शुध्दीकरणाचे संयंत्र बसवलं आहे ते कोणत्याही शासनाच्या निधीतून नाही तर चित्रलेखा पाटील यांनी स्वखर्चातून बसवलेलं आहे. पुर्वीपासून शेकाप हा आक्षी व रायवाडी गावाच्या पाठीमागे सदैव उभा रहिलेला आहे. आजही चित्रलेखा पाटील यांच्या रूपाने शेकाप तुमच्या पाठीशी उभा आहे, असे गौरवोद्गार शेकाप ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक यांनी काढले.

## दोन गटात तुंबळ हाणामारी

किरकोळ दुखापती झाल्या आहेत.

दरम्यान, प्रसाद नारायण कुथे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दीपक कमलाकर घासे, पुंडलिक कमलाकर घासे, प्रवीण दामोदर कुथे, रणधीर विठ्ठल भोईर यांच्यावर, तसेच पुंडलिक घासे यांच्या फिर्यादीनुसार प्रसाद नारायण कुथे, योगेश जनार्दन ठाकूर, अमोल चंद्रकांत खाडे, संकेत उर्फ संकेश शैलेश चोरगे, मच्छिंद्र लक्ष्मण ठाकूर, सुरेंद्र बंडू कुटे उर्फ भुऱ्या यांच्याविरोधात नागोठणे पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यातील दोन्ही गटातील आरोपींना नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरेश काळसेकर यांच्या नेतृत्वाखाली तात्काळ अटक करण्यात आली आहे. दोघे जण रुग्णालयात उपचारार्थ दाखल असल्याने त्यांना अटक केली नाही. या घटनेची माहिती मिळताच रोह्याचा अतिरिक्त कारभार असलेले पोलीस उपअधीक्षक पुष्कराज सूर्यवंशी यांनी मंगळवारी सकाळी घटनास्थळी भेट दिली. यातील अटक करण्यात आलेल्या आठही आरोपींना मंगळवारी न्यायालयात हजर करण्यात आले असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रमोद हंबीर हे करीत आहेत.

## आंबेनळी घाटामध्ये भूस्खलनाचा वाढता धोका

घाटामध्ये काही ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटना झाल्याचे दिसून येत आहे.

पोलादपूर तालुक्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या तुलनेमध्ये पोलादपूर, महाबळेश्वर, वाई, सुरूर राज्यमार्गावर दरडी कोसळण्याचे प्रमाण गेल्या काही वर्षांपासून वाढले असल्याचे दिसून आले आहे. पोलादपूर तालुक्यामध्ये जेसीबी आणि डम्पर यांची संख्या वाढीस लागल्यापासून पावसाळी ठेकेदारांना 'स्लॅक सीझन' ऐवजी 'एक्स्ट्रा इनकम' करण्याची संधी दरडी कोसळण्यामुळे होत असते.

२०२१ मध्ये दरडी कोसळल्याच्या ठिकाणांपेक्षाही अधिक ठिकाणी कार्यकर्त्यांनी पोलादपूर सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या मदतीने दरडी हटविण्याचे काम केल्याची बिले काढल्याने ज्या ठेकेदाराच्या नावाने ही बिले काढली त्याला आणि त्याचा मुलगा, पत्नी व भगिनी यांच्या नावानेही कोट्यवधी रूपयांची बिले अदा केल्याची माहिती माहितीच्या अधिकाराद्वारे प्राप्त झाली.

यंदादेखील आगामी पावसाळयामध्ये दरडी व मातीचे ढिगारे कोसळण्याची शक्यता असल्याने काही दरडप्रवण क्षेत्रांच्या तळाशी रस्त्यालगत काँक्रीटच्या भिंती उभारण्यात आल्या आहेत तर काही मातीचे ढिगारे कोसळू शकतील, अशा ठिकाणी गॅबियन पध्दतीच्या लोखंडी जाळी आणि दगडाच्या खापरांच्या भिंती उभ्या करण्यात आल्या आहेत. या दोनप्रकारच्या भिंती का उभारण्यात आल्या आहेत आणि त्यामुळे त्या डोंगरउतारावरील दरडी अथवा मातीचे ढिगारे कोसळण्यास प्रतिबंध कितपत होऊ शकेल, याबाबतील अभियांत्रिकी कारणमिमांसा करण्याची सार्वजनिक बांधकाम उपविभागाला कोणतीही आवश्यकता दिसून येत नसल्याची भूमिका या विभागाकडून दिसून येत आहे.

पोलादपूर तालुक्यात काळकाई मंदिर ते वाडा कुंभरोशी दरम्यानच्या दरडी कोसळण्याच्या घटनेवेळी रस्त्याला देखील तडे गेल्याचे दिसून आले. मात्र, त्याठिकाणी डोंगरउतारावरचे ढिगारे भविष्यात कोसळण्याची शक्यता कायम राहिली आहे. आंबेमाची, दाभिळ, पायटा आणि कुंभळवणेपर्यंतच्या भागात मातीचे ढिगारे आणि मोठ्या दरडी कोसळण्याची शक्यता दिसून येत आहे. काही ठिकाणी गांडुळकीची म्हणजेच भुसभुशीत माती असल्याने तर काही ठिकाणी डोंगरालगतची लालमाती उकरल्याने नव्याने दरडप्रवण क्षेत्र तयार झाले आहे. पोलादपूर तालुक्याच्या आंबेनळी घाटाच्या हद्दीत सार्वजनिक बांधकाम उपविभागामार्फत अनेक प्रकारची बांधकामे गेल्या दोन अडीच वर्षांमध्ये झाली असून या कामांच्या ठिकाणीदेखील दरडी कोसळू शकतील, अशी परिस्थिती आगामी पावसाळयात घडू शकणार आहे. यामुळे नजिकच्या काळामध्ये मोठी दुर्घटना घडून अथवा दरडी कोसळून काही काळ घाटबंद ठेवण्यापेक्षा संपूर्ण कामे उरकून अथवा जेवढया दरडी कोसळण्याची शक्यता आहे; त्याठिकाणी भूस्खलन झाल्यानंतरच आंबेनळी घाटातील वाहतुक सुरू केल्यास रस्ते सुरक्षिततेची पूर्वदक्षता घेता येणार आहे.

## पोलादपूरला तुफानी पाऊस

पोलादपूरकरांनी सुस्कारा सोडला. परंतु, अवकाळीने पोलादपूरमध्ये रविवारी सायंकाळी पुन्हा हजेरी लावली आणि शहरातील पिंपळपार ते फौलादजंगदरम्यानच्या रस्त्यावर एक झाड कोसळले. सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या कर्मचारी वसाहतीवर महाकाय वृक्ष कोसळून सरकारी खोल्यांचे नुकसान झाले. सुदैवाने तेथील कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय बचावले, तर चरई येथील एका कुटुंबाच्या घराचे छप्पर वाऱ्याने उडाल्याने नुकसान झाले आहे.

महावितरणकडून मान्सूनपूर्व कामांची सुरूवात झाली असतानाच अवकाळी पावसाने हजेरी लावली. यामुळे ग्रामीण भागातील विद्युतपुरवठा करणाऱ्या वीजवाहक तारा तुटून तसेच विजेचे खांब वाकून विद्युतपुरवठा बंद झाला. महावितरण आणि महापारेषणच्या कर्मचाऱ्यांनी या बिघाडावर तातडीने काम सुरू करून २४ तासांच्या कालावधीत विद्युतपुरवठा सुरळीत करण्यात यश मिळविले.

## कर्नाळ्यात होणार प्राणी गणना

पक्षी अभयारण्यात देखील वन विभागाचे अधिकारी आणि वन्यजीव प्रेमींच्या मदतीने प्राणी गणना करण्यात येणार आहे.वैशाख शुक्ल पौर्णिमा म्हणजेच बुद्ध पौर्णिमा ही उन्हाळ्याच्या दिवसातील सर्वाधिक प्रकाशमान रात्र असते. वैशाख महिन्यात उन्हाच्या झळा तीव्र असतात. त्यामुळे अरण्यातील प्राणी पाणी पिण्यासाठी हमखास पाणवठ्यावर येत असतात. कोरोना काळातील काही वर्ष वगळता कर्नाळा पक्षी अभयारण्यात दरवर्षी प्राणी गणना करण्यात येते. आता मात्र या प्रक्रियेला निसर्ग अनुभव असे नाव देण्यात आले आहे.

## अवैध वाळू उत्खनन?

सध्या जोरात आमटेम, निगडे, कासू, पांडापुर, शिहू, बेणसे, शहाबाज, वडखळ परिसरात सुरू आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, आमटेम-निगडेच्या खाडीमध्ये सुरू असणाऱ्या या अवैध उत्खननामागील खरा सूत्रधार हा राजकीय पक्षाच्या बड्या नेत्याच्या भाच्याचा मित्र असल्याचे बोलले जाते. एकीकडे दादर-रावे परिसरात परंपरागत उदरनिर्वाहासाठी हातपाटी व्यवसाय करणाऱ्या सर्वसामान्य गावकऱ्यांना बुडी मारून नियमबाह्य जास्त वाळू काढल्यास कारवाई केली जाते. मात्र, हजारो ब्रास वाळूचे उत्खनन रोजच्या रोज होत असताना हे महसूल प्रशासनाला दिसू नये अथवा दिसून त्याकडे पाहू नये असे का घडते, असा सवाल केला जात आहे. यात पोलीसच वाळूमाफियांना मतद करीत असावेत, असा संशय नागरिक बोलून दाखवत आहेत. एका गाडीमागे रूपये एक हजार मोजले जात असल्याची चर्चा होत असते. दर दिवसाला कमीत कमी ८ ते १० डंम्पर वाळू आमटेम-निगडेच्या खाडीवरून जात आहे.दरम्यान, येथे असणारी तलाठी महिला असल्याने त्यांचे वाळूमाफियांसमोर त्यांच काही चालत नसून, मंडळ अधिकारी हे सतत गैरहजर असल्याने या वाळूमाफियांचे फावत असल्याची चर्चा आहे. तरी, या वाळूमाफियांवर वेळीच महसूल खात्याने लगाम घालणे गरजेचे आहे. या वाळू उत्खननाविषयीदेखील उलट-सुलट चर्चा होत आहेत.

## भगवान गौतमबुद्ध महोत्सव

**नवी मुंबई :** भगवान गौतमबुद्ध यांचा २५६८ वा जयंती महोत्सव गुरुवार २३ मे २०२४ रोजी नवी मुंबईतील विविध बुद्ध विहारात विविध ,बुद्ध संस्थानच्या वतीने साजरा होत आहे. यावेळी नवी मुंबई संयुक्त नागरिक जयंती महोत्सव समितीच्या वतीने नेरुळ सेक्टर १२ येथील रामलीला मैदानावर बुद्धपोर्णिमा, मंगलोत्सव आणि जाहीर सभा गुरुवार २३ मे २०२४ रोजी सायंकाळी पाच वाजता पूज्य भदंत विमलकीर्ती गुणसिरी यांच्या अध्यक्षतेखालील होणार असल्याचे निमंत्रक भीम महोत्सव प्रणेते शरद सरवदे यांनी सांगितले. नवी मुंबईतील रबाले येथील प्रसिद्ध पंचशील बुद्ध विहारात माजी महापौर सुधाकर सोनावणे यांच्या अध्यक्षतेखाली बुद्ध जयंती मोठ्या उत्साहाने साजरा होत आहे. सकाळी पंचशील ध्वजारोहण व बुद्धवंदना होणार आहे. सायंकाळी बुद्ध उपासक- उपासिका यांना खीरदान तसेच बौद्धभिक्षू यांना माजी महापौर सुधाकर सोनावणे यांच्या उपस्थितीत चिवरदान होणार आहे. त्यानंतर बुद्ध शासन सभेचे प्रवचनकार पूज्यनिय विष्णु कदम यांचे बुद्ध आणि धम्म यावर परिसंवाद होणार आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. अक्षय रमाकांत जैतू यांनी खालील नमुद केलेली भातशेती मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालक श्री. जितेंद्र शरद गोरेगावकर, सौ. स्नेहल जितेंद्र गोरेगावकर यांचेसोबत स्वाक्षरीत झालेला आहे. सदरची भातशेती मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन

| मौजे | गट क. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| कोलमांडला ता. अलिबाग | २२ | क्षेत्र ०-४०-५० पो.ख ०-०१-९० एकुण क्षेत्र ०-४२-४० | १०.३६ |

वर वर्णन केलेली संपुर्ण भातशेती मिळकतीचे एकूण क्षेत्र ०-४२-४० हे. आर ही भातशेती मिळकत

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी
हे कळावे.

सही/-
ॲड. विकास एच.पाटील
युगंधर सोसायटी, शॉप नं. ६ युनियन बँकेजवळ,
ब्राम्हण आळी, ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा.नं. ७७९८८४४४३३

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. अक्षय रमाकांत जैतू यांनी खालील नमुद केलेली भातशेती मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालक जुबेदा अजीज पठाण, मुस्तुफा अजीज पठाण, मुजमील अजीज पठाण, मुस्तरी नवाजीश बकवाल व खाते क्र. १७६, गट नं. ११७ मुस्तुफा अजीज पठाण या मिळकतीवरील ग्रुप ग्रामपंचायत बोर्ली घर असेसमेंट नं. ३२९ यांचेसोबत स्वाक्षरीत झालेला आहे. सदरची भातशेती मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन

| मौजे | गट क. | क्षेत्र (हे. आर.) | आकार(रू. पैसे) |
|---|---|---|---|
| कोलमांडला ता. अलिबाग | १८ | क्षेत्र ०-२७-६० पो.ख ०-०२-०० एकुण क्षेत्र ०-२९-६० | ६.९३ |
| | ११७ | क्षेत्र ०-०२-०० | ०.०३ |

वर वर्णन केलेली संपुर्ण भातशेती मिळकतीचे एकूण क्षेत्र ०-२९-६० हे. आर व घर मिळकत ३२९ क्षेत्र ९० चौ.फु. (८.३६ चौ.मी.) क्षेत्र ०-०२-०० हे. आर आकार ०.०३ या मिळकतीवरील घर मिळकत.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार कसल्याही प्रकारची याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी
हे कळावे.

सही/-
ॲड. विकास एच. पाटील
युगंधर सोसायटी, शॉप नं. ६, युनियन बँकेजवळ,
ब्राह्मण आळी, ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा.नं. ७७९८८४४४३३

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. अक्षय रमाकांत जैतू यांनी खालील नमुद केलेली भातशेती मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालक श्रीमती निलिमा जनार्दन पाटील, श्री. सचिन जनार्दन पाटील, श्री. समीर जनार्दन पाटील, सौ. सुचिता सुहास तरे यांचेसोबत स्वाक्षरीत झालेला आहे. सदरची भातशेती मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन

| मौजे | गट क. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| वाघोलीवाडी ता. अलिबाग | ५ | क्षेत्र ०-२७-१० पो.ख ०-०१-३० एकुण क्षेत्र ०-२८-४० | ६.३८ |

वर वर्णन केलेली संपुर्ण भातशेती मिळकतीचे एकूण क्षेत्र ०-२८-४० हे. आर ही भातशेती मिळकत

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार कसल्याही प्रकारची याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही/-
ॲड. विकास एच. पाटील
युगंधर सोसायटी, शॉप नं. ६, युनियन बँकेजवळ,
ब्राम्हण आळी, ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा.नं. ७७९८८४४४३३

# पीएनपी महाविद्यालयाचा ९९ टक्के निकाल

। अलिबाग । प्रतिनिधी ।

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा निकाल जाहीर करण्यात आला. यामध्ये पीएनपी एज्युकेशन सोसायटीचा आर्ट्स, कॉमर्स व सायन्स वेश्वी-गोंधळपाडा बारावीचा निकाल ९९ टक्के लागला असून संस्थेमधून सायन्समधील सिया राजेश अग्रवाल ८८.६७ टक्के गुण मिळवून प्रथम, हर्षाली संदीप नागावकर ८३.६७ टक्के गुण मिळवून द्वितीय तर भाव्य जैन ८०.१७ टक्के गुण मिळवून संस्थेत तृतीय आलेली आहे.

आर्ट्स विभागाचा निकाल ९८.११ टक्के, कॉमर्स विभागाचा निकाल ९८.३३ टक्के तर सायन्स विभागाचा निकाल ९९.४१ टक्के लागला असून कॉलेजचा निकाल ९९ टक्के लागला आहे.





आर्ट्स मध्ये हर्षाली संदीप नागावकर ८३.६७ टक्के गुण मिळवून प्रथम, सरिता यादव ७८ टक्के गुण मिळवून द्वितीय, बिनयामिन अलाम ६७ टक्के व श्रीराज थळे ६७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला. कॉमर्स मध्ये रिया मुलीक ७४.८३ टक्के गुण मिळवून प्रथम, नभी जाधव ७०.६७ टक्के गुण मिळवून द्वीतीय तर संचिता राऊळ ६७.८३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. तर, सायन्स मध्ये सिया अग्रवाल ८८.६७ टक्के गुण मिळवून कॉलेजमध्ये आणि संस्थेत प्रथम, भाव्य जैन ८०.१७ टक्के गुण मिळवून द्वीतीय, तर निती जैन ७२.६७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेली आहे.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष आमदार भाई जयंत पाटील, खजिनदार नृपाल पाटील, कार्यवाह चित्रलेखा नृपाल पाटील, कॉलेजचे संचालक विक्रांत वार्डे, प्राचार्य रविंद्र पाटील, उपप्राचार्य निशिकांत कोळसे इतर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आदींकडून अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# अलिबागमध्ये मुलींची आघाडी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

बारावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी ऑनलाईन पध्दतीने जाहीर झाला. अलिबाग तालुक्याचा निकाल ९३.३२ टक्के इतका लागला आहे. त्यात ९६.४२ टक्के मुली आणि ९०.१७ टक्के मुले उतीर्ण झाले आहेत. मात्र, मुलांपेक्षा मुलींच्या निकालाच्या प्रमाणात ६.२५ टक्के आघाडी असल्याचे दिसून आले आहे. तालुक्यातील पीएनपी कॉलेज, जेएसएम कॉलेज, जा.र.ह. कन्याशाळा, इंडस्ट्रीयल कॉलेज, वि.म. पिळणकर कॉलेज, नाना पाटील हायस्कूल, चोंढी, आवास अशी अनेक ठिकाणी महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांचा निकाल जाहीर झाला असून त्यात पोयनाड येथील नाना पाटील ज्युनिअर कॉलेजचा निकाल ९७.९५ टक्के लागला आहे. आरसीएफ ज्युनिअर कॉलेजचा निकाल शंभर टक्के, चोंढी महाविद्यालयाचा निकाल ९५.७१ टक्के, आवासमधील महाविद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. त्यामुळे अलिबाग तालुक्यात महाविद्यालयांचा निकाल चांगला लागल्याचे बोलले जात आहे.

# माही जैन मुरूडमध्ये सर्वप्रथम

। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।

मजगावच्या नज ॲकॅडमी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय इंग्रजी माध्यमाच्या वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी माही भारत जैन ९४ टक्के गुण मिळवून मुरुड तालुक्यात सर्वप्रथम आली आहे.

या महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून खबाब कबले ८७.५० टक्के गुण मिळवून विद्यालयात दुसरा, तर मनाल कारभारी ८०.३३ टक्के गुण मिळवून तिसरी आली आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९७.४३ टक्के लागला असून ग्रिष्मा राऊळ ७७.१७ टक्के गुण मिळवून महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेत सर्वप्रथम, संस्कृती जंजिरकर ७४.१७ टक्के गुण मिळवून दुसरी तर भूमी जैस्वाल ७०.८३ टक्के गुण मिळवून तिसरी आली. या सर्वांचे संस्थेचे अध्यक्ष शफी तांडेल, नझराना बकाल, वसिम तांडेल, मेघा भंडारे, प्रितम वाळंज, मतिन हमदुले, मनाली पाटील, शहजाद उलडे, सुप्रिया मुंबईकर, दिलशाद दामाद, यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे वर्चस्व

। म्हसळा । वार्ताहर ।

न्यू इंग्लिश स्कूल आणि जुनिअर कॉलेज म्हसळाचा एकूण निकाल ९९% लागला असून अंजुमन हायस्कूलचा एकूण निकाल १००% लागला. ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांनी निकालात बाजी मारल्याचे निकालावरून स्पष्ट होते. यामध्ये वाणिज्य शाखेतून प्रथम रसिक धोकटे (८१%), प्रियल शिगवण द्वितीय (७७.५०%), वैष्णवी म्हात्रे (७७.३३%), कला शाखेतून प्रथम रोहिणी पवार (६७.८३%), समीर घाडगे द्वितीय (६७%), तिसरा यश पाडावे (६५.१७%), चौथा गौरव जाधव (६२.३३%) तसेच, मागास वर्गीयांमध्ये सानिया अशोक पवार प्रथम (७६.१७%) क्रमांक पटकावला आहे.

## उज्वल यशाची परंपरा कायम

। माणगाव । प्रतिनिधी ।

श्रीमती सविता नीलकंठ सावंत जुनिअर कॉलेजने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवीत या कॉलेजचा वाणिज्य शाखेचा बारावी परीक्षेचा निकाल ९६% इतका लागला आहे. हर्ष महाडिक या विद्यार्थ्याने ६७.६७ % इतके गुण संपादन करून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान पटकाविला. या कॉलेजमधून द्वितीय क्रमांक जागृती सुतार ६२.६७% , तर अमन मोहन सत्वे ६१% गुण तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

# सर एस.ए महाविद्यालयाचा ८५.३३ टक्के निकाल

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुडमधील सर एस.ए. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा बॅंकिंग शाखेचा १००टक्के निकाल लागला आहे. तर, कला शाखेचा ७५.२४ टक्के, वाणिज्य शाखेचा ९३.५४ टक्के निकाल लागला आहे.

यावेळी बँकिंग शाखेतुन प्रथम अंश शेडगे ६० टक्के, द्वितीय विनीत शेडगे ५४.३३ टक्के, तृतीय सर्वेश राऊत ५२.१७ टक्के. कला शाखेतुन प्रथम स्मरणिका म्हात्रे ७८.८३टक्के, द्वितीय अंतरा मसाल ६८.६७ टक्के, तृतीय सिद्धी वाडकर ५७.१७ टक्के. तर, वाणिज्य शाखेतुन प्रथम अनुज गायकर ८३.८३ टक्के, द्वितीय ईश्वरी चव्हाण ७७.८३ टक्के, तृतीय भूमिका गायकर ७६.३३ टक्के गुण मिळाले आहेत.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

# कापडे ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे यश

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

तालुक्यातील रायगड शिक्षण प्रसारक मंडळ महाड संचलित, श्रीवरदायिनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि रयत शिक्षण संस्थेच्या विद्यामंदिर ज्युनियर कॉलेजच्या बारावीच्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या निकालामध्ये घवघवीत यश मिळवले आहे. रयतची आर्टस शाखेची सुप्रिया रामचंद्र खुटेकर या विद्यार्थिनीने ७३ टक्के गुण मिळवित तालुक्यात एचएससी बोर्डामध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा बहुमान प्राप्त केला आहे.

श्रीवरदायिनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल ९६.०८ टक्के लागला असून विज्ञान शाखेत अविशा नारायण सुतार (६० टक्के) प्रथम, सृष्टी कृष्णा अजगणकर (५९ टक्के) द्वितीय, श्रध्दा पांडूरंग घोलप (५७.६७ टक्के) तृतीय क्रमांकाने अव्वलस्थानी राहिले. वाणिज्य शाखेचा निकाल ९८.१३ टक्के लागला असून या शाखेत सुरज सुरेश मोरे (७२.५० टक्के) प्रथम, तन्वी उमेश गाडे (६८.५०टक्के) द्वितीय, अदनान बशीर धामणकर (६५.३३ टक्के) तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. कला शाखेचा निकाल ७८.२६ टक्के लागला असून रवीना बाळू निरगुडे (५१.३३) प्रथम, पायल तानाजी उतेकर (४८.६७ टक्के) द्वितीय तर शुभदा अंकूश मोरे (४८.३३ टक्के) तृतीय क्रमांक मिळवून अव्वल स्थानी राहिल्या आहेत.

रयत शिक्षण संस्था सातारा संचलित विद्यामंदिर पोलादपूर व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या बारावी सायन्स, कॉमर्स आणि आर्टसच्या विद्यार्थ्यांचा निकाल कौतुकास्पद लागला असून सायन्स शाखेचे ९७.९१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कॉमर्स शाखेचे ९६.०७ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर आर्टस शाखेचे ८०.६४ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सायन्स शाखेमध्ये कोमल किशोर पालकर (६८ टक्के) प्रथम, सिध्देश बाळाराम सकपाळ (६६.३३ टक्के) द्वितीय तर तेजस तुकाराम साळुंखे (६१ टक्के) तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. कामर्स शाखेतील सृष्टी मनोहर चिकणे (७८.५० टक्के) प्रथम, मानसी मनीष साळवी (७२.५०टक्के) द्वितीय, संस्कृती सिताराम पवार (७१.५० टक्के) तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. आर्टस शाखेमध्ये सुप्रिया रामचंद्र खुटेकर (७३ टक्के) प्रथम, कविता अंकूश लोमटे (७२.५०टक्के) द्वितीय आणि एकनाथ रामचंद्र झोरे (६४ टक्के) तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.

## मोर्बा कॉलेजचा निकाल ९९.०७ टक्के

। माणगाव । प्रतिनिधी ।

एसएस ज्युनिअर कॉलेज मोर्बाने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या कॉलेजचा बारावीचा एकूण निकाल ९९.०७ टक्के लागला असून अदीबा अब्दुल रऊफ बंदरकर या विद्यार्थिनीने ९०.१७ टक्के इतके गुण संपादन करून कॉलेजमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे. या कॉलेजमधून निशत राऊत या विद्यार्थिनीने ८७.५० टक्के इतके गुण संपादन करून द्वितीय क्रमांक पटकावत कॉलेजच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला आहे.

# मोलमजुराची मुलगी तालुक्यात अव्वल

। पाली/बेणसे । वार्ताहर ।



पालीतील ग.बा. वडेर व व.ग. ओसवाल ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी व राबगाव येथील रहिवाशी प्रणाली श्याम खैरे हिने तब्बल ८०.८३ टक्के गुण मिळवून सुधागड तालुक्यात प्रथम आली आहे. प्रणालीची घरची परिस्थिती अतिशय हलाखीची असून तिची आई सुषमा व वडील श्याम हे मोलमजुरी करतात. अत्यंत खडतर परिस्थितीवर मात करत प्रणालीने हे यश संपादन केले आहे. प्रणालीच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्रणालीने आपली जिद्द व मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. तिच्या या यशात श्री. कॉमर्स क्लासेसचे संचालक संतोष भोईर यांचा मोलाचा वाटा आहे. तसेच, तिच्या कॉलेजच्या शिक्षकांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

## युईएस कॉलेजचे घवघवीत यश

। उरण । वार्ताहर ।

युईएस ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्सचे सायन्स विभागात १०० टक्के, तर कॉमर्स विभागात ९९.५५ टक्के प्राप्त करुन घवघवीत यश मिळवले. सायन्स विभागात यश म्हात्रे याने ९६.१७ टक्के मिळवून पहिला क्रमांक, सिमरन भगत हिने ९१.१७ टक्के मिळवून दुसरा क्रमांक, जुई डेरवणकर हिने ९०.३३ टक्के मिळवून तिसरा क्रमांक मिळविला. कॉमर्स विभागात अहमद शेख याने ९५.१७ टक्के मिळवून पहिला क्रमांक, पुजीता दर्णे हिने ९३.८३ टक्के मिळवून दुसरा क्रमांक, श्रावणी म्हात्रे हिने ९२.६७ टक्के मिळवून तिसरा क्रमांक मिळविला.

# समृध्दी घिसरे खालापूरात प्रथम

। खोपोली । प्रतिनिधी ।

जनता विद्यालय काँलेजमधील इंग्रजी काँमर्स विभागातील समृध्दी संतोष घिसरे हिने ९३.३७ टक्के गुण मिळवत खालापूर तालुक्यातून प्रथम आली आहे. तसेच, प.पू. गगनगिरी महाराज ज्युनियर काँलेजचा १०० टक्के निकाल लागला असून खालापूर तालुका शिक्षण मंडळाच्यावतीने तसेच सर्व स्तरातून विशेष कौतुक होत आहे.

जनता विद्यालय ज्युनिअर काँलेजमध्ये तालुक्यातील विविध भागातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. काँमर्स आणि सायन्स शाखेचे यंदा बारावीच्या परिक्षेला ९५२ विद्यार्थी बसले होते. त्यामधील ८७४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. इंग्रजी काँमर्स विभागातील समृध्दी संतोष घिसरे हिने ९३.३७ टक्के गुण मिळवत खालापूर तालुक्यातून प्रथम आली आहे. सायन्स शाखेचा पियुष आत्माराम माळी ९० टक्के गुण मिळवत दुसरा आला आहे. तर, इंग्रजी काँमर्स विभागातील आदित्य ओमप्रकाश पांडे ८९ टक्के गुण मिळवत तिसरा आला आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, कार्यवाहक किशोर पाटील, उपाध्यक्ष अबूशेठ जळगावकर, जनता विद्यालय ज्युनिअर काँलेज अध्यक्ष दिनेश गुरव, मुख्याध्यापिका दिशा राणे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य के. एम. गोरे, वसंतराव देशमुख ज्यु काँलेज अध्यक्ष उल्हासराव देशमुख, प.पू.गगनगिरी महाराज ज्युनियर काँलेज अध्यक्ष राजू अभाणी, मुख्याध्यापक गौरव तिवारी यांनी अभिनंदन केले आहे.

## ९७.८२ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण

। पनवेल । वार्ताहर ।

तालुक्यातील १०,५५८ विद्यार्थ्यांपैकी १०,३२८ विद्यार्थी बारावीच्या परिक्षेत उत्तीर्ण झाले असून ९७.८२ टक्के निकाल लागला आहे. आरएसएस आर्टस, व्ही.के हायस्कूल, सी. के.ठाकूर कॉलेज, महात्मा एज्युकेशन सोसायटी, एन.एन. पालिवाल कॉलेज, सुधागड एज्युकेशन सोसायटी महाविद्यालय या सहा महाविद्यालयांमध्ये पाचशेहून अधिक विद्यार्थ्यांनी बारावीची परिक्षा दिली होती.

# दक्षता म्हात्रे अंजुमनमध्ये सर्वोत्तम

। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।



मुरुड शहरातील अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमधील विज्ञान शाखेतील विद्यार्थिनी दक्षता दतात्रेय म्हात्रे हिला ६०० पैकी ५४० गुण मिळवून ९० टक्के प्राप्त करून मुरुड तालुक्यात सर्वोत्तम गुण मिळवणारी मुलगी ठरली आहे. तेलवडे ग्रामीण भागात राहून या विद्यार्थीने सर्वोत्तम गुण मिळवल्याबद्दल सर्व स्थरातून तिचे अभिनंदन होत आहे. तसेच, साझीया चौधरी या विद्यार्थिनीस ६०० पैकी ५०६ गुण मिळवत तिने ८४.३३ टक्के गुण मिळवले आहेत. बोर्ली मांडला येथील मोहोल्कर कुलसुम इस्लाम उद्दीन या विद्यार्थिनीस ७९.३३ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक आला आहे. अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूलचे ८० विद्यार्थी परीक्षेस बसले होते त्यापकी ७९ पास झाले. ४ विद्यार्थी डिस्टिंक्शनमध्ये आले, तर २५ विद्यार्थ्यांना फर्स्ट क्लास मिळाला आहे. कला शाखेचा निकाल ९५.५५ टक्के एवढा लागला आहे. हमडुले झैद या विद्यार्थिनीस ७४.३३ टक्के गुण मिळाले आहेत. टाके मारिया मोह्हम्मद अझीम हिला ६९ टक्के गुण मिळाले आहेत. तुळवे मदिहा मिर्झा हिला ६१.५० टक्के गुण मिळाले आहेत.

# तेरा महाविद्यालयाचे निकाल १०० टक्के

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात परीक्षा देणाऱ्या २३६४ विद्यार्थीपैकी २२११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यशस्वी विद्यार्थ्यांची टक्केवारी ९४.२० टक्के एवढी आहे. दरम्यान, कर्जत तालुक्यात तब्बल १३ कनिष्ठ महाविद्यालय मधील विद्यार्थी यांनी १००टक्के निकाल लावले असून तालुक्यात नेरळ विद्या मंदिर कनिष्ठ महाविद्यालय मध्ये सर्वाधिक ९८.५५ टक्के विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.

मोठ्या कनिष्ठ महाविद्यालय असलेल्या अभिनव ज्ञान मंदिर कर्जत यांच्या तिन्ही शाखांचा निकाल ८८.५२ टक्के इतका लागला असून तेथील ६२५ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. तर, नेरळ विद्या मंदिर कनिष्ठ महाविद्यालय यांचा तिन्ही शाखांचा निकाल ९८.५५ टक्के इतका लागला असून तेथे ४९१ पैकी ४७७ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. तालुक्यात १६ कनिष्ठ महाविद्यालय असून त्यात सर्वाधिक विद्यार्थी हे कर्जत अभिनव आणि नेरळ विद्या मंदिर येथे शिक्षण घेत असतात. बारावीचे परीक्षेला बसलेल्या २३४७ विद्यार्थी यांच्यापैकी २२११ विद्यार्थी यशस्वी झाले असून तालुक्याचा सरासरी निकाल हा ९४.२०टक्के इतका लागला आहे. त्यात १६० विद्यार्थ्यांना ७५ टक्के हून अधिक गुण मिळाले आहेत, तर ६९८ विद्यार्थी प्रथम श्रेणी मध्ये आणि १०४९ विद्यार्थी हे द्वितीय श्रेणी मध्ये यशस्वी झाले आहेत.

अभिनव मध्ये कला शाखेचा निकाल ९८.२७ टक्के इतका लागला आहे तर कला शाखेचा निकाल ५७.७३ टक्के इतका लागला आहे. नेरळ विद्या मंदिर कनिष्ठ महाविद्यालय येथे विज्ञान शाखेचा निकाल १००टक्के तर कला शाखेचा निकाल ९९.६९ टक्के इतका लागला आहे. तेथे वाणिज्य शाखेचा निकाल ९९.६० टक्के इतका लागला आहे. कशेळे येथील भाऊसाहेब राऊत कनिष्ठ महाविद्यालय येथे कला शाखेचा निकाल ९०.५६ टक्के लागला असून वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के लागला आहे. गौळवाडी मध्ये कला शाखेचा निकाल ९३.१०टक्के लागला आहे, तर वाणिज्य शाखेचा आणि बाह्य विभगात विज्ञान आणि कला शाखा यांचा निकाल देखील १००टक्के लागला आहे. डिकसळ येथील भाऊसाहेब राऊत महाविद्यालय येथे कला शाखेचा निकाल ७४.४१टक्के आणि वाणिज्य शाखेचा निकाल ९०.६४ टक्के लागला आहे. तर, नम्रता आचार्य कनिष्ठ महाविद्यालयाचे दोन्ही शाखांचे निकाल १०० टक्के लागले आहेत. कडाव येथील हुतात्मा हिराजी पाटील कनिष्ठ महाविद्यालय मधील विज्ञान आणि वाणिज्य शाखा यांचे निकाल १०० टक्के तर कला शाखेचा निकाल ६८ टक्के लागला आहे.नेरळ येथील हाजी लियाकत कनिष्ठ महाविद्यालयाचे विज्ञान शाखेचा निकाल १००टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ८७.५०टक्के लागला आहे. आश्रमशाळा मध्ये विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के आणि कला शाखेचा निकाल ९५.२२ टक्के लागला आहे. कशेळे येथील ऑर्किड कनिष्ठ महाविद्यालयाचे कला शाखेचा निकाल ९४ टक्के तर कला शाखेचा १०० टक्के आणि वाणिज्य शाखेचा निकाल ९३टक्के लागला आहे. दामत येथील फैज ज्युनियर कॉलेज मध्ये कला शाखेचा १०० टक्के आणि वाणिज्य शाखेचा निकाल ८७टक्के लागला आहे.माथेरान व्हॅली कनिष्ठ महाविद्यालय चे विज्ञान शाखेचा निकाल ६७.९४ टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ९५टक्के लागला आहे. अभिनव व्होकल मध्ये ९३ टक्के निकाल लागला आहे.

## निकम कॉलेजचा १०० टक्के निकाल

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव एजुकेशन ट्रस्ट संचालित एस.एस.निकम ज्युनिअर सायन्स कॉलेज माणगावने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या ज्युनिअर कॉलेजचा बारावी परीक्षेचा एकूण निकाल १०० टक्के लागला असून हूमेरा मुबीन अहमद झेटम या विद्याथीनीने ९२.६७ टक्के इतके गुण संपादन करून कॉलेजमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे. या कॉलेजमधून इफहम अकबर अली धनसे या विद्यार्थिनीने ८७.३३ टक्के इतके गुण संपादन करून द्वितीय क्रमांक, राबीया नुरूल इसलाम अकलेकर या विद्यार्थिनीने ८७ टक्के इतके गुण संपादन करून तृतीय क्रमांक पटकावत कॉलेजच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला आहे.

# तळा महाविद्यालयात मुलींची बाजी

। तळा । वार्ताहर ।

तळा येथील कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९७.८६% लागला असून यावर्षीही निकालात मुलींनी बाजी मारली आहे. यामध्ये विज्ञान शाखा १००%, वाणिज्य शाखा ९७.०५% व कला शाखेचा ९५.% असा एकूण निकाल ९७.८६ % लागला. यामध्ये कला शाखेतुन प्रथम क्रमांक मयुरी देवकर (७९.६७), द्वितीय क्रमांक रितेश नागे(७०.६७) व तृतीय क्रमांक देविदास पायाजी (६५.६७) यांचा आला. वाणिज्य शाखेतून प्रथम क्रमांक सिद्धी चौलकर (८४.३३), द्वितीय क्रमांक माधवी शिगवण (८४.१७) व तृतीय क्रमांक प्राजक्ता करंजे (८३.१७) यांचा तर विज्ञान शाखेतून प्रथम क्रमांक सई म्हात्रे (७४.००), द्वितीय क्रमांक शमा कुरुक्कर (७३.३३), आर्या गायकवाड(७३.३३) व तृतीय क्रमांक कार्तिक पाटील (७२.८३) असा लागला असून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्यावतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

# कला शाखेचा ८१.८१ टक्के निकाल

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील चिरनेर येथील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या ज्युनिअर कॉलेजच्या इयत्ता बारावीच्या कला शाखेचा शेकडा निकाल ८१. ८१ टक्के इतका लागला आहे. परीक्षेसाठी कला शाखेतील एकूण ७७ विद्यार्थी बारावीच्या परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ६३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यात प्रियल कोळी हिने ४२३ गुण मिळवून ती ७०.५० टक्क्यांनी चिरनेरच्या ज्युनिअर कॉलेजमध्ये पहिली आली. सांज नारंगीकर हिने ३८५ गुण मिळवून ६४.१७ टक्क्यांनी ती ज्युनिअर कॉलेजमध्ये दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली. अस्मिता पाटील हिने ३७६ गुण मिळवून ६२.६७ टक्क्यांनी ज्युनिअर कॉलेजमध्ये तिसरी आली. वैष्णवी वशेणीकर हिने ३७५ गुण मिळवून ती ६२.५० टक्क्यांनी जुनियर कॉलेजमध्ये चौथी आली. काजल चव्हाण हिने ३६९ गुण मिळवून ६१.५० टक्क्यांनी जुनिअर कॉलेजमध्ये पाचवी आली.

# कामगारांनी लुटले मालकाला

## अलिबाग तालुक्यातील तुडाळ येथील घटना

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग येथील तुडाळ येथे कामाला असलेल्या दोन कामगारांनी मालकालाच लुटण्याचा प्रकार घडला आहे. त्यांच्याकडील ७ लाख ३३ हजार रुपयांचा ऐवज या दोघांनी लंपास केल्याची घटना रविवारी दुपारी घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, गुंजीस येथील फिर्यादी यांच्याकडे छत्तीसगड येथील कामगार कामाला होते. शुक्रवारी दुपारी तुडाळ एमआयडीसी रस्त्यावर दोन कामगारांनी फिर्यादीकडे असलेला ऐवज त्यांनी गायब केला. ही बाब मालकाच्या लक्षात येण्याअगोदर दोघेजण गायब झाले. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# मोहोपाड्याच्या शहरीकरणात झपाट्याने वाढ

। रसायनी । वार्ताहर ।

परिसराचा केंद्रबिंदू व सुसज्ज बाजारपेठ असलेल्या मोहोपाड्याचे शहरीकरण फार झपाट्याने होत आहे. त्यामुळे मोहोपाड्याचे महत्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे. रसायनीतील वाढलेली लोकसंख्या आणि मोहोपाडातील वाढते शहरीकरण यामुळे परिसरातील जागेच्या किमती सर्वसामान्यांच्या आवाक्यात आहेत. म्हणूनच नवी मुंबईपासून तासाभराच्या अंतरावर असलेली रसायनी सर्वांना सोयीची व सुखद वाटत आहे. रसायनी पाताळगंगा हे औद्योगिक क्षेत्र असल्याने रोजीरोटीसाठी, कामधंद्यासाठी येणाऱ्या चाकरमान्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पंचवीस वर्षांपूर्वी वावेघर पोस्ट कार्यालयातून पत्रव्यवहाराचा कारभार चालायचा. सन २००० नंतर रसायनी पोस्टाची स्वतःची इमारत होऊन कामकाज सुरू झाले.



परिसरात भारतीय स्टेट बँक, बँक ऑफ इंडिया, सिंडीकेट बँक, कॅनरा बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, ॲक्सिस बँक, रायगड डिस्ट्रिक्ट बँक, महाड को. ऑफरेटीव्ह बँक आदी सुरू आहेत. परिसरात अनेक कंपन्यांच्या वसाहती, हिरानंदानी प्रकल्प यामुळे रसायनी भारदस्त व बहुमजली इमारतींनी फुलू लागली आहे. मोहोपाडा शहरालगत एमआयडीसी वसाहत, सिप्ला वसाहत, रिलायन्स वसाहत, बकुळ, अल्कली, बॉम्बे डाइंग वसाहत आहेत. तसेच रिस ते मोहोपाडा रस्त्यालगत असणाऱ्या वसाहती संकुल लक्ष वेधून घेत आहेत.

www.krushival.in
बुधवार, दि. २२ मे, २०२४
कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# पुण्यातील खून

पुण्यात एका बिल्डरच्या अल्पवयीन मुलाने केलेल्या अपघाताचे प्रकरण सध्या गाजते आहे. रविवारी पहाटे दारु पिऊन हा मुलगा भरधाव वेगाने गाडी चालवत होता. त्यावेळी त्याने एका बाईकवरून जाणाऱ्या दोघांना उडवले. त्यात ते ठार झाले. मात्र इतके होऊनही हा मुलगा अल्पवयीन असल्याने त्याला न्यायालयाने तात्काळ जामीन दिला. पोलिसांनी त्याला चौदा दिवस निरीक्षणगृहात ठेवण्याची केलेली मागणीही फ ` टाळण्यात आली. शिवाय, मुलाची सुटका करताना त्याने एक निबंध लिहावा, वाहतूक पोलिसांसोबत पंधरा दिवस घालवावेत आणि मानसोपचार घ्यावेत अशा फुटकळ वाटतील अशा अटी घालण्यात आल्या. न्यायालयाने आपल्या परीने व कायद्याच्या अधीन राहून न्याय केलाही असेल कदाचित. पण मुलाने केलेल्या गुन्ह्याच्या पार्श्वभूमीवर अशा शिक्षा म्हणजे मृतांच्या कुटुंबियांच्या दुःखांवर डागण्या देण्यासारखे आहे. बिल्डरचा हा मुलगा सतरा वर्षे आठ महिन्यांचा होता. म्हणजे तो सज्ञान होण्यास आणखी केवळ चार महिने बाकी होते. सीबीएसई बारावी परिक्षेच्या निकालानंतर आनंद साजरा करण्यासाठी तो मित्रांसोबत बाहेर पडला होता. हे सर्व जण एका पबमध्ये जाऊन दारू प्यायले. त्यानंतर घरी परतताना गाडी या मुलाने चालवायला घेतली व ताशी १७०-८० च्या वेगाने तो पुण्याच्या कल्याणीनगर, येरवडा भागात बराच काळ फिरत होता. हा घटनाक्रम पाहता, एका अल्पवयीन मुलाकडून नकळतपणे वा अनवधानाने झालेला हा अपघात नाही हे स्पष्ट व्हावे. श्रीमंतीची मस्ती, पैशांच्या जोरावर आपण काहीही करू शकतो हा उन्मत्तपणा या मुलामध्ये पुरेपूर दिसतो. तरीही त्याला वयाचा फायदा मिळून तो सुटत असेल तर आपल्या कायद्यांमध्ये नक्कीच गंभीर त्रुटी आहेत. त्या ताबडतोब दूर करण्याची गरज आहे. आता या मुलांच्या वडिलांना अटक करण्यात आली आहे. या मुलाविरुध्द सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्याच्याविरुध्द नेहमीप्रमाणे खटला चालवण्याची मागणी पोलिस सत्र न्यायालयात करणार आहेत.

## आमदार का गेले?

मिडियामध्ये आरडाओरडा झाला व अनेक सामाजिक संस्थांनी निषेध केला म्हणूनच याचा इतका बभ्रा झाला. अन्यथा, अपघातानंतर झालेल्या गोष्टी पाहता हे प्रकरण केव्हाच दडपले गेले असते हे स्पष्ट होते. पहाटे अडीच वाजता अपघात झाला आणि तीन वाजता राष्ट्रवादीचे वडगाव शेरीचे स्थानिक आमदार सुनील टिंगरे हे पोलिस ठाण्यात दाखल झाले. टिंगरे यांचे म्हणणे असे की, माझ्या मतदारसंघात भीषण अपघात झाल्याची खबर मिळाली म्हणून मी तातडीने आलो. यात अनेक प्रश्न उपस्थित होतात. एकतर ही अपरात्रीची वेळ होती. त्यावेळी आमदारांना इतक्या लगोलग ही खबर कोणी कळवली असेल? दुसरे म्हणजे आमदार महोदय आपल्या मतदारसंघातल्या अशा प्रत्येक अपघाताच्या वेळी तातडीने पोलिस ठाण्यात येतात काय? थोडक्यात, मुलाचे वडिल पैशाने भारी असलेले बिल्डर असल्याने आमदार मजकूर धावत आले हे उघड आहे. एखाद्या गरिबाच्या हातून असाच अपघात झाला असता तर ते इतक्या त्वरेने आले नसते. शिवाय, मुळात एक अपघात झाला, तिथे आमदारांचे कामच काय हाही प्रश्न आहेच. आपण पोलिस ठाण्यात गेलो व त्यांनी कायद्यानुसार योग्य ती कारवाई करावी असे त्यांना सांगितले असे टिंगरे यांनी म्हटले आहे. वास्तविक, अशी कारवाई करणे हे पोलिसांचे कर्तव्यच आहे. आरोपी मोकाट किंवा पळून गेलेला होता व जमाव जमलेला होता अशी काहीच स्थिती नव्हती. आरोपी पोलिसांच्या ताब्यात होता. घटना प्रत्यक्ष पाहणारे अनेक लोक मौजूद होते. त्यामुळे पुढील कारवाई करावी लागणे हे क्रमप्राप्तच होते. अशा वेळी आमदारांनी तेथे जाण्याचे तसे काही कारण नव्हते. तरीही टिंगरे तेथे भल्या पहाटेच गेले व नंतर आरोपीची हसत हसत सुटका झाली याचा संबंध लोकांनी जोडला आणि पोलिस व न्यायालय यांच्यावर दोषारोप केले तर ते चूक म्हणता येणार नाही.

## कायदे बदला

हा सगळा ओरडा झाल्यावर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांना कडक कारवाईचे निर्देश दिले. मात्र मुळात असे बिल्डर्स किंवा धंदेवाले यांचे भाजपच्या नेत्यांशी, सत्ताधाऱ्यांशी आणि पोलिसांशी असलेले संबंध व त्यातून होणारे गैरप्रकार रोखण्यात त्यांच्या गृहखात्याला यश आलेले नाही हे या घटनेमुळे पुन्हा एकवार समोर आले. किंबहुना, या सरकारच्या काळात बिल्डर इत्यादींची युती अधिक घट्ट झाल्याचे बोलले जाते. दरम्यान, अल्पवयीनांना गुन्हे करूनही निसटू देणारे हे जे कायदे आहेत त्यांचा आढावा घेऊन बदल करण्याची गरज आहे. दहा वर्षांपूर्वी दिल्लीत एका नर्सिंगच्या विद्यार्थिनीवर बसमध्ये बलात्कार झाला होता. निर्भया नावाने गाजलेल्या या प्रकरणातले आरोपी किंवा नंतर मुंबईच्या शक्ती मिल कंपाउंडमध्ये झालेल्या बलात्कार प्रकरणातले आरोपी हे अल्पवयीन असल्याचा बचाव करण्यात आला होता. शक्ती मिल बलात्कार प्रकरणातला आरोपी त्यानुसार सुटला होता व नंतरही त्याने काही गंभीर गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले होते. अल्पवयीनांसंदर्भात हे कायदे झाले तेव्हाची स्थिती वेगळी होती. आज समाजातील वास्तव बदलले आहे. त्याचा विचार करून हे कायदे ताबडतोब बदलावे लागणार आहेत. या अपघातात बळी गेलेले अनिश अवधिया आणि अश्विनी कोस्टा हे दोघे वयाच्या पंचवीशीच होते व कम्प्युटर इंजिनिअर होते. त्यांनी व त्यांच्या आईवडिलांनी त्यांच्याबाबत अनेक स्वप्ने पाहिली असतील. मात्र त्यांचा काहीही अपराध नसताना एका श्रीमंत बापाच्या उद्दाम मुलाच्या चुकीपायी त्यांचा हकनाक बळी गेला आहे. या अपघातानंतर पोलिसांनी या बळी गेलेल्यांना सहानुभूती दाखवण्याऐवजी त्यांच्या मित्रांना व नातेवाइकांचीच उलटतपासणी घेतली अशा बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. सामान्य माणसांचा हा नेहमीचा अनुभव आहे. आरोपी श्रीमंत आणि सत्तेत कनेक्शन असलेला असला की त्याला शाही वागणूक मिळते व फिर्यादींनाच उलटे धारेवर धरले जाते. निवडणुका संपल्या. आता तरी फडणवीसांनी जरा आपल्या खात्याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

---

**विचार**

# अंतर्बाह्य बदलवून टाकणारी ‘आत्मबोध’

परशुरामाच्या पदस्पर्शाने पावन झालेली कनकेश्वर भूमी आणि तिच्या पायथ्याशी असलेले ‘केतकीचा मळा’ या ठिकाणी काही सिद्धपुरुषांच्या आशिर्वादाने जन्माला आलेले महर्षी न्यायरत्न विनोद उर्फ आप्पा बालपणापासूनच आप्पांची कुशाग्रबुद्धी होती. व्याघ्रण या छोट्या गावी ४ थी पर्यंतचे शिक्षण घेऊन पुढील शिक्षणासाठी त्यांना शिक्षकांच्या शिफारशीने मुंबईला पाठविण्यात आले. शाळेत असतांनाच इंग्लिश व संस्कृत वाङ्मयांचा सखोल अभ्यास त्यांनी केला. हस्तसामुद्रिक, मुदासामुद्रिक व ज्योतिषशास्त्र याचे ते जाणकार होते. न्यायदर्शनातील विद्वत्तेबद्दल न्यायरत्न ही पदवी त्यांना देण्यात आली. तसेच दर्शनालंकार विश्वशांती सचिव अशा बहुमोलाच्या पदव्या त्यांना मिळाल्या त्यांचा अध्यात्माचा अभ्यासही गाढा होता. त्यामुळे ‘आध्यात्म महर्षी’ म्हणूनही गौरविण्यात आले.

आप्पा हे उत्तम वक्ते होते. स्वामी विवेकानंदानी अमेरिकेत ज्या व्यासपीठावर भाषण केले त्याच ठिकाणी आप्पांनी भाषण केले. भारतात तसेच अमेरिकेतही दुःखी, अपंग मनोरुग्ण किंवा व्यसनाधीन लोकांवरही न्यायरत्न उपचार करीत. म्हणून अमेरिकेत त्यांना डॉक्टरेट ही पदवी देण्यात आली. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली व अभंग रचले. त्यांचा ‘धवलागिरी’ हा अध्यात्मिक ग्रंथ प्रसिद्ध झाला. अशारितीने जगभरात प्रसिद्धी पावलेल्या आप्पांना अनुरूप, अशी पत्नी लाभली. आप्पांच्या पत्नी ‘मैत्रेयी’ या त्याकाळात मॅट्रीकच्या परीक्षेत महाराष्ट्रात पहिल्या आल्या व नंतर एम.ए.व बी.टी पर्यंतचे शिक्षण त्यांनी घेतले. आप्पा व मैत्रेयी गांचे जीवन अतिशय आनंददायी, परस्पर विश्वासाचे आणि भरभराटीचे गेलं, महर्षी न्यायरत्न विनोद यांच्यावर मैत्रेयी यांनी ‘अहो सौभाग्यम’ हे पुस्तक लिहिले.

आप्पांना ३ मुले व २ मूली अशी ५ अपत्ये होती. त्याकाळातही सर्वजण उच्च शिक्षण घेऊन आपआपल्या क्षेत्रात पूढे गेले

आप्पाचे सर्वात धाकटे चिरंजीव डॉ. संप्रसाद विनोद यांच्या कार्याबद्दल मी बोलणार आहे.

नाना दुःखी प्राप्ती जयासी उद्देश नाही चित्ती आणि सुखाचीया आरती आडपैतेने । या ज्ञानेश्वरातील ओवीप्रमाणे बाबा दुःखाने उद्विग्न आणि सुखाने उत्तेजित होत नाही. असे स्थितप्रज्ञ योगी पुरुष आहेत. त्यांच्या परिसस्पर्शाने अनेक



जणांचे जीवन अंतर्बाह्य उजळून निघाले आहे. ते पुण्यात ‘शांतीमंदीर’ येथे राहतात. तरुणवयापासूनच त्यांना सामाजिक कार्याची आवड होती ते बी.टी. मेडिकल कॉलेज ला एमबीबीएस करत असतांनाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले आणि तेव्हा त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. ते अंतर्मुख झाले. त्यांनी आप्पांच्या ‘धवलगिरी’ ग्रंथाचा अभ्यास केला.

पुढे गंगोति येथे राहून त्यांनी साधना केली. तेथील वास्तव्यात बाबांना ‘शवासन-ध्यान’

**सौ. वंदना गर्गे-जोशी**

ही अभिनव ध्यान पद्धती स्फुरली. गंगोत्रीतल्या महात्म्यांबरोबर आणि जाणकार योग्यांबरोबर या ध्यान पद्धतीची त्यांनी चर्चा केली. त्यांनी ही ध्यान-पद्धती आधुनिक काळाला अनुरूप असल्याचा निर्वाळा देऊन बाबांना आशिर्वाद दिले.

गंगोत्रीहून पुण्यात आल्यावर बाबांनी योगविद्येवरचे ग्रंथ आणि पातंजल सूत्रांचा सखोल अभ्यास केला. प्रगाढ चिंतन मनन केले. स्वतःवर प्रयोग केले. अनेक अनुभव घेतले त्यामुळे ‘शवासन-ध्यान’ अधिक संपन्न आणि सिद्ध झाले. अनेक नियतकालिकातून दिवाळी अंकांमधून योगप्रबोधनपर विपूल लेखन केले. १० पुस्तके लिहिली. जसा शंकराचार्यांचा अध्यात्मिक वारसा आप्पांनी पुढे नेला तसा आप्पांचा अध्यात्मिक वारसा बाबा पुढे चालवत आहेत. साधनेमुळे समोरच्याला समजून घेण्याची वृत्ती व क्षमतेत वाढ झाली. रोजच्या जीवनात कोणाशी कसे वागावे यासंबंधी आपल्यात बदल होतांना जाणवतात. त्यासाठी वेगळे प्रयत्न करावे लागत नाही.

बाबा सांगतात की आंतरिक परिवर्तन घडायला हवे आणि जसजशी साधना वाढत जाईल तसे परीवर्तन आपोआप होते. अज्ञानाची पटल आपोआप दूर होतात. (एखादा मुलगा गणित सोडवतांना गाईडची मदत घेत असेल किंवा मागची उत्तर बघत, असेल तर नंतर तो स्वतंत्रपणे उदाहरण सोडवू शकत नाही. त्यासाठी मूळ संकल्पना घेतली पाहिजे. संकल्पना स्पष्ट झाली की पुढे अडचण येत नाही हे उदाहरण बाबांनी सांगितल्यावर मी शिक्षिका असल्याने विद्यार्थ्यांकडे मी त्यादृष्टीने बघितल्यावर मला त्याची अनुभुती आली आणि प्रत्येक गोष्टीच्या मुळाशी जाणे किती महत्त्वाचं ते कळलं.

बाबा नेहमी सांगतात कुणाशी बोलतांना पूर्वग्रह दूषित ठेवून बोलू नये, समोरच्याचे म्हणणं पूर्ण ऐकून घेतले पाहिजे. या सर्व गोष्टी रोजच्या आयुष्यात अमलात आणल्यावर जादूची कांडी फिरवल्यासारखे सर्वे नातेसंबंध सुधारायला लागले आहेत व मन शांत झालंय. आत्मबोध हा जाणण्याचा विषय आहे. त्यात पूर्वग्रह कल्पनाविलास नको तर अनुभूती असायला हवी. स्वानुभवाने आत्मबोध झाला तर जीवनात शांती व आनंद सहज मिळेल. दृष्टी व दृष्टीकोन बदलला, आतून परिवर्तन झाले की अतिशय शांत वाटत.

आप्पा सांगतात लोकशाहीत संख्याबळाला महत्व असते. तर, प्रत्येकशाहीत गुणवर्धनाला महत्व असतं. साधनेमूळे समोरच्याचे म्हणणे शांतपणे- ऐकले जाते व आपले म्हणणं नम्रपणे मांडले जाते.

पुण्यामध्ये तसेच बाहेरच्या देशातही बाबांची योगसाधना करणारे अनेक साधक आहेत. कोव्हीडमुळे अनेक जणांचे नुकसान झाले. परंतू त्यावेळी बऱ्याच गोष्टी ऑनलाईन सुरू झाल्या तेव्हा आरसीएफ थळ या कंपनीत एम्प्लॉईजसाठी बाबांनी शवासन-योगाध्यान यावर लेक्चर घेतले व प्रात्यक्षिक करून घेतले. आपण पुण्यात जाऊन ही साधना करू शकत नाही याच मला दुःख वाटायचं पण थोड्याच दिवसात एका शिष्येने ऑनलाईन वर्ग सुरु केला आणि मला त्याचा लाभ मिळाला. सुरुवात अभिजात योगसाधनेनी झाली नंतर प्रयोगसाधनेला मात्र खूप गोष्टी उलगडायला लागल्या, ‘योगसाधना’ ही एक परीपूर्ण साधना आहे. याची जाणीव व्हायला लागली. त्यासाठी आसने करतांना स्थैर्य, सुखदा प्रयत्नशैथिल्य किंवा सहजता आणि अनंताशी एकरूपता या गोष्टी शिकायला मिळाल्या.

त्यापुढे ‘आत्मबोध’ म्हणजे आपल्याला अंतर्बाह्य बदलवून टाकणारी साधना आहे. शिकायला मिळतंय आणि खरोखर पदोपदी आपल्यात होणारा बदल जाणवतो व खूप आनंद मिळतो. कधी शनिवार येईल व बाबांकडून बोध होईल याची मी वाट पहातो. अध्यात्म म्हणजे आत्मतत्वाकडे कसे जायचे याची दिशा बाबा दाखवतात व आत्म्याच्या अस्तित्वाची अनुभूती घ्या म्हणून ते सांगतात. बाबांचे म्हणणे पटते.

सध्या ताणतणाव व होणाऱ्या स्पर्धेमुळे येणारा ताण वाढला आहे. आत्महत्या करणाऱ्यांची संख्या हल्ली वाढली आहे. याच्यावर उपाय म्हणजे औषधे नव्हे तर योगसाधना आहे म्हणजेच ‘योगसाधना’. खरोखर यात आपला आपण कबूल केला तर आपली प्रगती होते. मनाची स्वस्थता यावी, ताणतणाव कमी व्हावा. आतून बदल घडावा म्हणून साधनाही केलीच पाहिजे. हे तंत्र म्हणून न वापरता त्याच्याशी एकरूप झाले पाहिजे.

बाबांनी, शोध लावलेली ही शवासन-ध्यान साधना अलिबागला व त्याच्या आसपासच्या सर्व गावातून व्हायला हवी असा माझा छोटासा दृष्टीकोन आहे.

आता परवाच ‘नाच ग घूमा’ हा चित्रपट मी पाहिला. त्याची गोष्ट बऱ्याच लोकांना माहिती पण असेल. ऑफिसमधील काम करणारी महिला आणि मोलकरीण यांच्यातल्या संघर्षावरील ते कथानक आहे. मोलकरणीला समजून घ्यायला तिला किती वेळ लागतो हे त्या गोष्टीत दाखविले आहे. तेव्हा माझ्या मनात लगेच विचार आला की आत्मबोध साधनमुळे हा बदल आपल्यात तर कधीच झालाय. आपल्यासारखच त्या कामवाल्या (मावशीच आयुष्य आहे, स्वतंत्र अस्तित्व आहे याची जाणीव मला साधनेमुळे कधीच झाली आहे आणि त्यामुळे आमच्यात एक मनमोकळ नातं निर्माण झालंय. हे सर्व नात्यांमध्येही घडू शकतं.

त्यामुळे ही साधना समजायला किंवा त्याचा लाभ घ्यायला मला उशिरच झालाय पण आपल्या इथल्या तरूण मुलामुलींनी लवकरात लवकर याचा लाभ घ्यावा व त्यांना आनंदी आयुष्याची गुरुकिल्ली मिळावी असे मला वाटते. बाबांच्या परमपूज्य योगी संप्रसाद विनोद उर्फ बाबा हे नुकतेच वयाची पंच्याहत्तरी पूर्ण करत आहेत व या परिपूर्ण योगसाधनेला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त विविध शवासन - ध्यानाची शिबिरे आम्ही जाणून घेणार आहोत. २ जून अलिबागला आरसीएफ कॉलनीत शवासन-ध्यानाचे शिबीर घेणार आहोत. तुम्ही सर्वांनी लाभ घ्यावा असं मला वाटतंय.

---

**आजकाल**

# प्रार्थनास्थळे- ३० लाख, शाळा-१५ लाख

आसाम मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सर्मा (तेच.... ज्यांची तक्रार होती की राहुलने कुत्र्याला वेळ देणे प्राथमिकता मानली) म्हणे.

‘‘सव्वा कोटी बांगलादेशी भारतात घुसले आहेत‘‘

हिमंता सैन्यावर आणि शाह वर का आरोप करत आहे? कसे?

बांगलादेशातून घुसखोर कसे घुसतील?

तर सीमा क्रॉस करून. सीमेचे संरक्षण कोण करतं?

(बॉर्डर सिक्युरिटी फोर्स).

म्हणजे हिमंत भारतीय सैन्यावर कुचकामी असल्याचा किंवा भ्रष्ट असल्याचा आरोप करत आहे असा अर्थ होत नाही का?

बरं गेली १० वर्ष हे कोणाच्या अधिकारक्षेत्रात येते? असो.

हिमंतानी आता उगा अश्रू ढाळू नये.

मोदीजींनी यावर योग्य कारवाई केली आहे.

घुसखोरी, पलायन शक्यतो आपल्याहून अधिक प्रगत व अधिक संधी असणाऱ्या ठिकाणी होत असते.

मोदीजींनी भारताचे दरडोई उत्पन्न बांग्लादेशहुन कमी केले, आणि बेरोजगारी बांगलादेशच्या दुप्पट.... ज्यामुळे,

घुसखोरीचा प्रश्न आपोआप सुटला.

देशाची लोकसंख्या वाढत आहे.

दर वर्षी साधारण २ कोटी मुलं जन्म घेतात



म्हणजे अंदाजे तितकीच शाळेत जाण्याच्या वयाची होत असतील.

देश डेमोग्राफिक गोल्डन पिरियड मधून जात आहे.

आणि हे चित्र !

**सूरज सामंत**

त्याशिवाय सरकारी शाळा सुद्धा खाजगी व्यावसायिकांच्या घशात घालण्याचा डाव आहे.

कारण शाळा असते गावाच्या, शहराच्या मध्यभागी... आणि शाळेसोबत शाळेची जागा, जमीन सुद्धा देता येते ना.

कारण प्राथमिकताच गंडली आहे.

शाळा नाही तर मंदिराच्या नावावर मतं मागितली जातात.

तुम्ही मला १ गाव दाखवा जिथे प्रार्थनास्थळ नाही.... त्या प्रत्येक गावासाठी मी १० गावे दाखवीन जिथे शाळा नाही.

भारतात अंदाजे ३० लाख प्रार्थनास्थळे आहेत (अधिकृत)

त्यातील उ प्र मध्ये ३.५ लाख आहेत. युपी सकट महाराष्ट्र, बंगाल, राजस्थान, कर्नाटक, आंध्र या सहा राज्यांत मिळून देशातील ५०% प्रार्थनास्थळे आहेत.

१९९१ ते २०११ मध्ये अंदाजे १२ लाख नवीन प्रार्थनास्थळे बांधली गेली. आणि आता नवीन प्रार्थनास्थळे बांधण्याचा वार्षिक वेग अजून वाढला आहे.

भारतात अंदाजे १५ लाख शाळा आहेत. २०२०/२१ मध्ये २०००० शाळा बंद झाल्या व शिक्षकांची संख्या देखील १.९५% ने कमी झाली.

त्यात, शाळांची अवस्था हा विषयच वेगळा आहे.

भारतात सरकारी व खाजगी मिळून अंदाजे ७०००० इस्पितळे आहेत. व एकूण अंदाजे १५ लाख हॉस्पिटल बेड्स आहेत.

भारतात प्रत्येक १००० स्वतंत्र इमारतींमध्ये मध्ये ९ प्रार्थनास्थळे, ६ शाळा व २ इस्पितळे आहेत.

स्वतःच्या पिनकोड एरियात आज फेरफटका मारा.

किती नवीन शाळा, हॉस्पिटल्स, प्रार्थनास्थळे आणि कार्यस्थळे बांधली जात आहेत याचा अंदाज बांधता येऊ शकतो.

त्यातल्या त्यात ठाणे जिल्हा भारतात वेगळा दिसतो कारण ११००० हॉस्पिटल आणि ८३०० प्रार्थनास्थळे.

(‘अनधिकृत’ आकडे गृहीत धरले नाहीत.

---

**लोकसंसद**

## भविष्यात तरी मतदारांची अशी कुचंबणा होऊ नये

एकीकडे मतदारांनी मतदान करावे यासाठी प्रसारमाध्यमातून, समाजमाध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न करणाऱ्या निवडणूक आयोगाच्या ढिसाळ कारभारामुळे मतदान केंद्रावर आलेल्या मतदारांना अनेक हालअपेष्टांना तोंड द्यावे लागले. मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य बजावण्यासाठी अनेक मतदार सकाळपासूनच उत्साहाने बाहेर पडले. मात्र आयोगाच्या नियोजनातील अनेक त्रुटींमुळे या उत्साहावर पाणी पडले. मतदानाच्या संथ प्रक्रियेमुळे अनेक ठिकाणी लांबच लांब रांगा लागल्या. त्यातच कडक उन्हात ताटकळत राहावे लागल्याने हालात भर पडली. मतदार याद्यांची पुनर्रचना करताना घोळ झाल्यामुळे मतदार यादीतून अनेकांची नावे गायब झाली. त्यामुळे मतदान केंद्रावर मतदानासाठी पोहोचलेल्या अनेकांना माघारी फिरावे लागले. अनेक ठिकाणी मतदान यंत्रामध्ये आणि व्हीव्हीपॅटमध्ये बिघाड झाला. परिणामी मतदारांना तिष्ठत बसावे लागले. मतदान केंद्रावर आलेल्या ज्येष्ठ नागरिक, विकलांग लोकांना असुविधांमुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागला. मतदार केंद्रात मोबाईल नेण्यास मनाई असल्याची माहिती मतदारांपर्यंत पोहचली नाही. त्यामुळे मोबाईल घेऊन मतदान केंद्रावर आलेल्या मतदारांना पोलिसांनी मज्जाव केल्याने अनेक मतदार मतदान न करताच आल्या पावली परत गेले. महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका अवघ्या चार महिन्यावर आल्या आहेत.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

---

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२२ मे**

**१८७१ :** महाराष्ट्रातील एक शांकरमतानुयायी आणि प्राचीन वाङ्मयाचे भाषांतरकार अद्वैती विष्णू वामन बापट यांचा जन्म २२ मे १८७१ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील धालवड या गावी झाला. प्राथमिक, माध्यमिक शिक्षण रामदुर्ग व मिरज येथे झालेल्या बापटांनी पुढे गर्व्हमेंट हेलिग्राफिक क्लासमध्ये शिक्षण घेतले. त्यानंतर रेल्वेत नोकरीला लागले. नोकरी करत असतानाच संस्कृतचे अध्ययन करून कराचीत सिंध कॉलेजात प्राध्यापक म्हणून रुजू झाले. कराचीत असताना प्रा. लागू यांच्याकडून अष्टाध्यायी आणि सिद्धांत कौमुदीचे शिक्षण घेतले.तसेच वाईच्या श्रीप्रज्ञानंद सरस्वती यांच्याकडून प्रस्थानत्रयीचे प्राचीन पद्धतीने अध्ययन केले. यानंतर हैदराबाद येथील गिडमल संस्कृत पाठशालेत शास्त्री म्हणून रुजू झाले. कालांतराने पुण्यात स्थायिक झाले. ’ब्रह्मदिद्याग्रंथ, रत्नमाला, दर्शनमाला, आचार्य ही नियतकालिके त्यांनी चालवली. गीता, उपनिषदे आणि ब्रह्मसूत्र या प्रस्थानत्रयीच्या शांकरभाष्यानुसार परिचय त्यांनी मराठीतून घडविला. त्यांच्या नावावर ७० हून अधिक भाषांतरीत ग्रंथ असून त्यात निम्याहून अधिक आद्यशंकराचार्यांच्या ग्रंथाची मूळ संस्कृतसह भाषांतरे आहेत. त्यात शंकराचार्यकृत आत्मबोध आणि अपरोक्षानुभूती या ग्रंथाचे अनुवाद उल्लेखनीय आहेत. याशिवाय श्री जैमिनी अश्वमेध, श्रीयाज्ञवल्क्यस्मृती, वृहद्योगवासिष्ठसाराचे चार भाग, एकनाथी भागवत आदी भाषांतरीत ग्रंथ त्यांच्या नावावर आहे. ईश, केन, कठ आदी ११ उपनिषदे, बादरायणप्रणित ब्रह्मसूत्रे आणि श्रीमद् भगवद्गीता यांची त्यांनी भाषांतरे केली. भाषांतराबरोबरच या ग्रंथांचे सुबोध भाषात्मक शैलीत विवेचन करून त्या ग्रंथातील शांकरप्रणित अद्वेतमताचे समर्थन आदि प्रचार करण्यात त्यांनी आपले सारे आयुष्य ’ब्रह्मविद्या ग्रंथरत्नमाला’ या मासिकातून त्यांनी चार्वाक, बौद्ध, जैन आदि सौख्य, खर्च केले. इत्यादी दर्शनांचा परिचय करून दिला. एकंदरीत संस्कृतचे बरेचसे प्राचीन साहित्य मराठीत आणणाऱ्या बापटांचे २० डिसेंबर १९३२ रोजी निधन झाले. **१८९८:-** लेखक दत्तात्रय अनंत खंडकर यांचा जन्म. ‘कृतार्थ’ या पुस्तकातून त्यांनी आपल्या जीवनात आलेले शैक्षणिक विश्वातील अनुभव कथन केले आहेत. **१९३४:-** गेली सहा दशकापासून चित्रपटसृष्टीविषयक सातत्याने लेखन करणारे ज्येष्ठ सिनेअभ्यासक, लेखक, पत्रकार इसाक मुजावर यांचा जन्म. भारतीय चित्रपटसृष्टीचा जिता-जागता इतिहास अशी त्यांची ओळख. ‘तारका’ या चित्रपट विषयक मासिकातून लेखनाचा श्रीगणेशा करणाऱ्या मुजावरांनी पुढे साप्ताहिक ‘रसरंग’ निवासी व कार्यकारी संपादक तसेच चित्रानंद, माधुरी व जी आदी साप्ताहिकात महत्त्वपूर्ण जबाबदारी निभावली. ‘एका सोंगाड्याची बतावणी’, ‘अलबेला मास्टर भगवान’, ‘चित्रमाऊली’, ‘मीनाकुमारी’, ‘मुखवटा’ या पुस्तकातून त्यांनी मराठी चित्रपटांचा इतिहास आजच्या पिढीसमोर ठेवला. हिंदी चित्रपटसृष्टीवरही त्यांनी मराठीतून विपूल लेखन केले. **१९४२:-** ‘हंस’, ‘पैजण’, ‘स्वराज्य’ आदी मासिकांतून लेखन करणारे मीननाथ विश्वनाथ जोशी यांचा जन्म. ‘अजातपक्षी’ हा कथासंग्रह त्यांचा प्रकाशित. **१९४३:-** विविध नियतकालिकांतून १५० हून अधिक कथालेख लिहिणारे लेखक, कादंबरीकार सुरेश शंकर बल्लाळ यांचा जन्म. ‘जगावेगळे वचन’, ‘अवसेचा चंद्र’, ‘दाकपुत्र’ या कादंबऱ्या. कुमारांसाठी ‘संख्या नगरीचा फेरफटका’ हे गमतीदार पुस्तक आणि ‘मयुरपंख’ हा ललित लेखसंग्रह अशी साहित्य संपदा. **१९५८:-** नाट्यलेखक सुनीत नारायण देशपांडे यांचा जन्म. ‘आपुलकी’, ‘जिवंत मरण’ ही त्यांची नाटके प्रकाशित झाली आहे. **१९७९:-** कलासमीक्षक बाळकृष्ण मार्तंड दाभाडे यांचे निधन. रवींद्रनाथ टागोरांचे ‘गीतांजली’ वाचून त्यांनी तीन गद्यकाव्ये आणि दोन नाटिका लिहिल्या होत्या. ‘भारतीय चित्रकला’ हा प्रबंधवजा ग्रंथ आणि ‘सौंदर्यांच्या शोधात’ हे सिंधू व आर्य संस्कृतीच्या काळातील वैशिष्ट्यांचा आढावा घेणारे पुस्तक त्यांनी लिहिले. ‘विद्यामंदिरात’ या पुस्तकातून त्यांचा शिक्षणविचार दिसला. **१९९१:-** भारतीय कम्युनिस्ट चळवळीचे प्रणेते कॉ.श्रीपाद अमृत डांगे यांचे निधन. ‘गांधी व्हर्सेस लेनिन’, ‘गुरुदेवाची हाक’, ‘भारत’, ‘शिवाजी : त्यांचा आणि आमचा’, ‘इतिहास कोण घडवतो?’, ‘नरकपुरी गवसली’ ही पुस्तके यांनी लिहिली होती. ‘इंदुप्रकाश’ मध्ये उपसंपादक असलेल्या कॉ. डांगे यांनी पुढे ‘क्रांती’ हे साप्ताहिक सुरु केले होते. डॉ. अशोक चौसाळकरांनी त्यांचे अभ्यासू चरित्र लिहिले होते. **१९९८:-** समीक्षक-संपादक, नाटककार, पटकथा लेखक असा लौकिक मिळवणारे डॉ. मधुकर आष्टीकर यांचे निधन. ‘वेदकालीन स्त्रिया’, ‘ध्वनिसिध्दांत’, ‘चांगदेव पासष्टी’ (संपादन) च्या अभ्यासू योगदानाखेरीज ‘तीन इसम १३ आणे’, ‘प्रत्येकाला जोडा चावतो’ अशा हलक्याफुलक्या नाटकांसह एकंदर ५७ पुस्तके त्यांच्या नावावर आहेत.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२२ मे
१) श्री. गजानन तुकाराम लखमदे
विद्यानगर, अलिबाग, २२-५-१९५२
२) श्रीम. अंजली संतोष वाकडे
नागडोंगरी, अलिबाग, २२-५-१९६३


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



नम्रता गणेश वरळीकर, पेण

# पाणी योजना कोरडीच!

## चाफेवाडी नळपाणी योजना कोणाच्या घशात; ग्रामस्थांचा संतप्त सवाल

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
**कर्जत तालुक्यातील खांडस ग्रुप ग्रामपंचायतीमधील चाफेवाडीसाठी शासनाच्या जलजीवन मिशनमधून नळपाणी योजना राबविण्यात आली आहे. मात्र, त्या नळपाणी योजनेच्या उद्‌भव विहिरीमध्ये भरपूर पाणीसाठा असतानादेखील परिसराला पाणी वितरण केले जात नाही. त्यामुळे ही योजना अवघ्या वर्षभरात कोणाच्या घशात घालण्यात आली, असा सवाल स्थानिक ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.**



खांडस ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत चाफेवाडी ही वाडी असून, त्या मुख्य वाडीच्या आजूबाजूला पाच आदिवासी वाड्या आहेत. त्या वाड्यांसाठी जलजीवन मिशनमधून नळपाणी योजना २०२१ मध्ये मंजूर झाली होती. २८ डिसेंबर रोजी जलजीवन मिशनमधून या नळपाणी योजनेच्या कमला मंजुरी मिळाली आणि प्रत्यक्ष काम २७ जुलै २०२३ रोजी पूर्ण झाले. त्या नळपाणी योजनेमध्ये चिल्हार नदीवर विहीर तसेच पंप हाऊस, उद्‌भव विहिरी, उंचावरील पाणी साठवण टाकी तसेच वितरण व्यवस्था, याशिवाय तेथे नदीवर असलेल्या बंधाऱ्याची दुरुस्ती आदी खर्च निविदेमध्ये अंगीकृत करण्यात आला होता. पाच वाड्यांसाठी असलेल्या नळपाणी योजनेची पाणी योजना कार्यान्वित झाली आणि अवघ्या सहा महिन्यांत बंद झाले आहे. तेथील शेतकरी अनंता बापऱ्या हिंदोळा यांच्या जमिनीमध्ये मुख्य उद्‌भव विहीर बांधण्यात आली आहे. त्या विहिरीमध्ये आजही भरपूर पाणी आहे. तरीदेखील गेल्या तीन महिन्यांत विहिरीमध्ये पाणी नाही असे कारण सांगून गावातील नळाला पाणी सोडले जात नाही. त्यामुळे नळपाणी योजना स्थानिक काही लोकांसाठी आहे की गावासाठी हा प्रश्न निर्माण झाला आहे. याच अन्य वाडी मध्ये असलेल्या ग्रामस्थांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याने आवाज उठवायला आहे. सर्व वाड्यांसाठी असलेल्या या चाफेवाडी नळपाणी योजनेचे तीनतेरा वाजले असल्याने ही नळपाणी योजना ग्रामस्थांसाठी आहे की कोणा एकट्यासाठी, अशी स्थिती निर्माण झाली आहे.

लाखो रुपये खर्चून नळपणी योजना बनविली आहे आणि त्या योजनेच्या निविदेमध्ये चिल्हार नदीमधील सिमेंट बंधाऱ्याची दुरुस्ती करण्यासाठी निधी मंजूर होता. मात्र, संबंधित योजनेचे काम ठेकेदाराने बंधाऱ्याची कोणत्याही प्रकारची दुरुस्ती केली नाही आणि त्यामुळे उद्‌भव विहिरीचे खाली असलेल्या बांधऱ्यात आज पाणी नाही. त्या बंधाऱ्याचेदेखील कोणतेही काम ठेकेदाराने केले नसल्याने जलजीवन योजनेचे तीनतेरा वाजले आहेत. त्यामुळे ही योजना कोणाच्या घशात घालण्यासाठी बनविली होती काय, असा प्रश्नदेखील आदिवासी विचारत आहेत.

> नळपाणी योजनेचे पाणी वितरण करणारे कर्मचारी बदलले असल्याने आणि पाणी वितरण बंद झाले आहे. नळपाणी योजनेची समिती बनविण्यात आली आहे. विहिरीमध्ये पाणी असल्याने ते पाणी वितरण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. मात्र, येथील पाणीटंचाई दूर करण्यासाठी टँकर सुरू आहे.
> – श्री. मोरे, ग्रामविकास अधिकारी खांडस ग्रामपंचायत

# विद्यार्थ्यांना ट्युलिप इंटर्नशिप पत्राचे वाटप

**। पनवेल । वार्ताहर ।**
आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ भारत अभियान अंतर्गत महापालिकेच्या घनकचरा व स्वच्छता विभागामध्ये द अर्बन लर्निंग इंटर्नशिप प्रोग्रॅम राबविला जात आहे. ट्युलिप हा केंद्र शासनाचा उपक्रम असून, विद्यार्थ्यांना शहरी प्रश्नांची जाणीव व्हावी व महापालिका करत असलेल्या कामाचे स्वरूप समजवून घेऊन आपल्या नवनवीन संकल्पना राबविण्याविषयी प्रोत्साहन देण्यात येत असते. या ट्युलिप कार्यक्रमांतर्गत महापालिकेच्यावतीने ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. यामध्ये पिल्लई इंजिनिअरिंग कॉलेजचे सात व सरस्वती इंजिनिअरिंग महाविद्यालयाच्या एका विद्यार्थ्यांची निवड महापालिकेने केली आहे. उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप पत्राचे वाटप करण्यात आले.

यावेळी घनकचरा व आरोग्य विभागाचे विभागप्रमुख अनिल कोकरे, पर्यावरण विभागाचे विभाग प्रमुख मनोज चव्हाण, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये कार्यात्मक कौशल्ये वाढविणे आणि त्यांच्या ऊर्जा व कल्पनांचा उपयोग करून शहरांच्या भविष्यासाठी उपाय तयार करण्यासाठी सहनिर्मिती करणे, स्थानिक स्वराज्य संस्थेच्यावतीने राबविण्यात येणार्या उपक्रम, आव्हाने यामध्ये विद्यार्थी पर्यायाने तरूण वर्गाचा सहभाग वाढविण्यासाठी ही ट्युलिप कार्यक्रमाची संकल्पना सुरू करण्यात आली आहे.

इंटर्नशिप पूर्ण झाल्यानंतर या विद्यार्थ्यांना महापालिकेच्यावतीने प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या प्रमाणपत्राचा उपयोग विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यामध्ये त्यांच्या नोकरीमध्ये, व्यवसायामध्ये होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी केले आहे.



# एटीएम फोडणाऱ्यांना ठोकल्या बेड्या

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
अवकाळी पावसाने कर्जत तालुक्यात वीज खंडित झाली होती. त्याचा फायदा घेऊन नेरळ बाजारपेठेत असलेले आयसीआयसीआय बँकेचे एटीएम मशीनची तोडफोड करून चोरीचा प्रयत्न झाला होता. दरम्यान, नेरळ व्यापारी फेडरेशनकडून नेरळ पोलिसांची भेट घेऊन त्या चोरट्यांचा लवकरात लवकर पकडून आणण्याचे आवाहन केले होते. पोलिसांनी आठ दिवसांच्या आत अंबरनाथ येथून त्या चोरट्यांना पकडून आणत गजाआड केले आहे.



१५ मे रोजी रात्री नेरळ परिसरात रात्रीच्या वेळी लाईट नव्हती. त्याचा फायदा घेऊन अज्ञात व्यक्तींनी नेरळ बाजारपेठेत आयसीआयसीआय बँकेचे एटीएम मशीन कोणत्यातरी हत्याराने फोडून त्यामधील रोख रक्कम चोरी करण्याचा प्रयत्न केला होता. त्याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, नेरळ पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांनी पोलीस उपनिरीक्षक समीर लोंढे, सहायक फौजदार श्रीरंग किसवे, पोलीस हवालदार नवनाथ म्हात्रे, पोलीस शिपाई निरंजन दवणे, राजेभाऊ केकाण, विनोद वांगणेकर यांना मार्गदर्शन केले असता संबंधित पथकाने तपास सुरू केला होता. नेरळ रेल्वे स्टेशन येथून प्राप्त केलेले सीसीटीव्ही फुटेज व गुप्त बातमीदार यांच्या मदतीने गुन्हा उघडकीस आणून गुन्ह्यात आरोपी वांगणी येथून किशोर दौलत शिंदे यास दि.२० मे रोजी ३.५७ वाजता अटक करण्यात आली. त्याचा साथीदार विधीसंघर्षग्रस्त बालक हा गुन्हा केल्यापासून फरार असल्याची माहिती त्याच्याकडून प्राप्त झालेली असून, पोलीस त्या फरारी साथीदाराचादेखील शोध घेत आहेत.

आरोपीला पकडण्यात आल्यानंतर नेरळ व्यापारी फेडरेशनकडून नेरळ पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे आणि अन्य तपासी अधिकारी यांची भेट घेऊन चोरट्याला तात्काळ अटक केल्याबद्दल आभार मानले.

# मुरुडचा रस्ता खड्ड्यात

## सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष

**। कोर्लई । वार्ताहर ।**
मुरुडच्या परेश नाका ते मारुती नाका रस्त्यावर तहसीलदार कार्यालयासमोर रस्त्यावर गेल्या अनेक दिवसांपासून खड्डे पडले आहेत. याकडे संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दुर्लक्षाबाबत नाराजी व्यक्त होत असून, खड्डे बुजविण्याची मागणी केली जात आहे.

परेश नाका ते मारुती नाका मुख्य रस्त्यावर तहसीलदार कार्यालय, वनविभाग, सेतू, न्यायालय, पोस्ट आदी महत्त्वाची कार्यालये असून, या ठिकाणी विविध कामांसाठी तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. या रस्त्यावर गेल्या अनेक दिवसांपासून खड्डे पडले असून, वेळप्रसंगी अपघाताची शक्यता आहेत. तरी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी यात लक्ष पुरवून पावसाळ्यापूर्वी येथील खड्डे बुजविण्याची मागणी जोर धरत आहे.






# चाकरमानी लागले परतीच्या प्रवासाला

**। तळा । वार्ताहर ।**
लग्नसराईसाठी गावी आलेले चाकरमानी पुन्हा परतीच्या प्रवासाला लागले आहेत. यामुळे तळा बसस्थानक परिसरात चाकरमान्यांची गर्दी झाल्याचे चित्र पहायला मिळाले.

तळा तालुक्यात रोजगाराचे साधन नसल्याने तालुक्यातील बहुतांश तरुण पिढी व कुटुंबे रोजगाराच्या शोधात मुंबई, पुणे, ठाणे, दिवा, नालासोपारा आदी शहरांमध्ये स्थलांतरित झाली आहेत. मात्र, सणवारासाठी हे स्थलांतरित झालेले चाकरमानी आवर्जून आपल्या गावी परतत असतात. एप्रिल व मे महिन्यातील लग्न सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणावर चाकरमानी आपल्या गावी परतले होते. तसेच मे महिन्यात गावोगावी असलेल्या गावकीच्या पूजा, गोंधळ, पालख्या यांमुळे ओसाड असलेली गावे पुन्हा भरून गेली होती. हे सर्व सोहळे आटोपल्यानंतर चाकरमानी पुन्हा आपल्या परतीच्या प्रवासाला लागले आहेत. यासाठी तळा बसस्थानकात प्रवाशांची गर्दी होऊन बसमध्ये आपली आरक्षित केलेली जागा शोधण्यासाठी प्रवाशांची लगबग पाहायला मिळाली.

# फणसाडमधील प्राण्यांची होणार गणना

## गुरुवारपासून उपक्रमास शुभारंभ

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**
मुरुड तालुक्यातील उसरोली ग्रामपंचायत हद्दीतील सुपेगावजवळील फणसाड अभयरण्यात येत्या गुरुवारी बुद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून प्राण्यांची गणना करण्यात येणार आहे.

सुमारे ५४ कि.मी. क्षेत्र परिसरात फणसाड अभयारण्याचा विस्तार झालेला आहे. नवाब सरकाराने हे अरण्य स्वातंत्र्यपूर्व काळापासुन संरक्षित केलेले आहे. या अभयारण्यात १७ प्रकारचे वन्यप्राणी आहेत. यामध्ये बिबट्या, सांबर, भेकरे, डुक्कर, शेकरु, पिसोरी, ससा, काळेमांजर, रानमांजर ,जवादा, सालिंदर, मुंगा, वानर, मोर, गिधाड आदी प्राण्यांचे वास्तव्य आहे. या अभयरण्यात ७१८ प्रकारचे वृक्ष, १७ प्रकारचे सस्तन प्राणी, २७ प्रकारचे साप, १६४ प्रकारचे रंगीबेरंगी पक्षी, ९० प्रकारची फुलपाखरे (ब्ल्यू मॉरमॉन, मॅप) आदी फुलपाखरे दिसून येतात. याबरोबर नाग, फुरुस, घोणस, मण्यार, वायपर असे विषारी व हरणटोळ, अजगर यासारखे बिनविषारी साप येथे आढळतात. या सर्व प्राण्यांची गणना केली जाते. यंदा प्राण्यांमध्ये वाढ होणार की तेवढीच संख्या राहणार ते लवकरच कळणार आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जयंती महोत्सव

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**
रायगडच्या रोहा येथील तक्षशीला बौद्ध विकास संघ, सांगडे यांच्या वतीने तथागत बुद्ध आणि भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन दि.२३ मे रोजी करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला आ. अनिकेत तटकरे, तहसीलदार किशोर देशमुख, पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, गटविकास अधिकारी शुभदा पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष घनश्याम कराले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.



या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता जयंती महोत्सवाचे अध्यक्ष यशवंत शिंदे यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहण करून करण्यात येणार आहे. रात्री मनोरंजनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम म्हणून बुध्द भीम गीतांवर आधारित अमित पाटील प्रस्तूत 'रंग माझ्या महाराष्ट्राचा' या ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला मालसईचे सरपंच, उपसरपंच, सर्व कार्यकारिणी, बौद्ध महासभा, बौद्धजन पंचायत व बौद्ध युवा संघाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते तक्षशिला नगर सांगडे या ठिकाणी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक मेहनत घेत आहेत.

## वाहतूक पोलिसांची कारवाई

**अलिबाग :** वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रायगड जिल्ह्यातील १९३ वाहन चालकांवर वाहतूक पोलिसांनी सोमवारी कारवाई केली. त्यांच्याकडून १ लाख ३० हजार रूपयांचा दंड वसूल करण्यात आला. हेल्मेट नसणे, विना परवाना वाहन चालविणे, जादा प्रवासी वाहतूक करणे अशा अनेक वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांना वाहतूक पोलिसांनी कारवाईच्या माध्यमातून दणका दिला. बेशिस्त चालकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न यातून करण्यात आला.

# अल्पवयीन मुलाचा बहिणीवर बलात्कार

## पॉर्न व्हिडीओ पाहून धक्कादायक प्रकार

**। पनवेल । वार्ताहर ।**
एका १३ वर्षीय मुलाने आपल्या १५ वर्षीय बहिणीवर बलात्कार केल्याप्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अल्पवयीन मुलीचा मेडिकल रिपोर्ट समोर आल्यानंतर भावाविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोट दुखत असल्याने १५ वर्षीय मुलगी आपल्या आई-वडिलांसह वाशी येथील रुग्णालयात गेली होती. त्यानंतर ती तीन महिन्यांची गरोदर असल्याचे समोर आले. हॉस्पिटल प्रशासनाने यासंदर्भातील माहिती वाशी पोलिसांना दिली होती. मुलीने दिलेल्या जबाबानुसार भाऊ-बहिणीने डिसेंबर महिन्यामध्ये पॉर्न व्हिडीओ पाहिले होते. त्यांनी व्हिडीओतील गोष्टी करून पाहण्याचे ठरवले. दरम्यान, जानेवारी महिन्यामध्ये छोट्या भावाने बळजबरी केली अन् मोठ्या बहिणीवर बलात्कार केला. मासिक पाळी न आल्याने याची माहिती मुलीने आपल्या आईला दिली. त्यानंतर तिच्या आई-वडिलांनी तिला हॉस्पिटलमध्ये नेले, असे वाशी पोलिसांनी सांगितले.

माहितीनुसार पीडित मुलीचे आई-वडील हाऊसकिपिंगचे काम करतात. वडील दहा हजार रुपये प्रति महिना कमावतात, तर आई आठ हजार रुपये महिन्याला कमावते. याशिवाय वडील मिळेल ते काम घेत असतात, रात्रीचे ओव्हरटाईमदेखील ते करतात. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आई-वडील घराच्या बाहेर गेल्यानंतर हा प्रकार घडला आहे. मुलाला बाल कल्याण विभागासमोर सादर करण्यात आले आहे. मुलाविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवाय बालकांचे लैंगिक गुन्ह्यापासून संरक्षण (पोस्को) कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येणार आहे.

# तालुक्यातील नारळ बागायतदार संकटात

## सततच्या घटत्या उत्पादनाने हवालदिल

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**
**भात, सुपारीसह नारळाचे उत्पादन हे मुरुड तालुक्यातील बागायतदारांचे एक प्रमुख उत्पादन असून, त्यापासून येथील बागायतदार शेतकऱ्यांना चार पैसे हमखास मिळतात. परंतु, कोकणातील या कल्पवृक्षाला गेल्या काही वर्षांपासून अस्मानी व सुलतानी संकटांची दृष्ट लागल्याने उत्पादनात सातत्याने घट होऊ लागली आहे. त्यामुळे येथील बागायतदार शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.**

मुरुड तालुक्यातील एकूण पिकाखालील क्षेत्रापैकी ४३५ हेक्टर क्षेत्रावर नारळ पिकाची लागवड करण्यात आली आहे. येथील मुरुड तालुक्यासह नांदगाव, मजगाव, आगरदांडा, मांडला, भोईघर, सर्वे-चिकणी, काशिद, बोर्ली व अन्य अनेक गावागावांतून नारळाचे उत्पादन घेतले जाते. तीन वर्षांपूर्वीच्या निसर्ग चक्रीवादळात तालुक्यातील ७७.४७ हेक्टर क्षेत्र बाधित झाल्यामुळे फळे देणारी कित्येक



माडाची झाडे अक्षरशः जमीनदोस्त झाल्याने बागायतदारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले.

येथील बागायतदार हे दोन प्रकारे नारळाचे उत्पादन घेतात. एक तर ते सुकलेले नारळ वीस ते तीस रुपये प्रति नागाने विकतात अथवा येथे असलेल्या ठेकेदारांना (मलबारी) कच्चा नारळ अर्थात शहाळी काढण्यासाठी वर्षाकाठी प्रती झाडाला दोन ते अडीच हजार रुपये घेऊन ठेक्याने देतात. दीड ते दोन महिन्यांत एकदा असे वर्षाला सहा ते सात वेळा झाडांचे पाडे (शहाळी झाडावरून उतरवणे) होतात.

चांगल्या मशागतीत व हवामानात ते शक्य होते अन्यथा बागायतदारांबरोबरच ठेकेदारांनाही मोठे नुकसान सहन करावे लागते. कोरोना काळापूर्वी मुरुड तालुक्यातून दर आठवड्याला जवळपास सात ते आठ ट्रक अथवा टेम्पो भरून येथील शहाळी मुंबई अथवा वाशी मार्केटमध्ये जात असत. ते प्रमाण आता दोन चार टेम्पोवर आले आहे.

झाडांवर चढून शहाळी उतरणारे अथवा झाडावरचे सुकलेले नारळ पाडणारे, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी शहाळी वाहून नेणारे अशा सर्वांच्या मजुरीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. हंगामात मजूर उपलब्ध न झाल्यास मोठे नुकसान होते. काही बागायतदारांनी आपली माडाची झाडे माडी काढण्यासाठी दिली आहेत.

### रोगांचा प्रादुर्भाव

**मुरुडचे तापमान सध्या ३५ ते ४० अंशांवर पोहोचले आहे. बागायतींतील पाण्याचा तळ गाठलेल्या विहिरी व त्यात क्षाराचे वाढलेले प्रमाण यामुळेही फळगळती सुरू आहे. याशिवाय नारळाच्या झाडांना विविध रोगांनी ग्रासले आहे. यात उभ्या झाडाचा कोवळा कोंब कुजून त्यात आळ्या पडणे, झाडांच्या पानांवर करपा रोग पडून झाप करपणे, तंजावर मर रोग पडणे, गेंड्या भुंग्याने झाडाच्या कोंबाला पर्यायाने गाभाच पोखरून टाकल्याने उभे झाड वाळून जाणे, कोळी व पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव वाढल्याने झाडांच्या पानांवर पांढरी बुरशी दिसून येणे. परिणामी झाडांची अन्नरस तयार होण्याचे प्रमाण कमी झाल्याने फळांवर काळे डाग पडणे, त्याचा परिणाम खोडावर ही होऊन वेळीच उपाययोजना न केल्यास बाजते झाड मरुन जाणे, असे निरनिराळ्या रोगात झाडे बळी जात आहेत.**

### नारळाची झाडे अस्मानी संकटात

**औषध फवारणीसाठी वापरण्यात येणाऱ्या टू स्ट्रोक पॉवर स्प्रेची किंमत बाजारात पन्नास ते साठ हजार असल्याने गोरगरीब बागायतदारांना खरेदी करणे आवाक्याच्या बाहेरचे आहे. शिवाय, पंपाने फवारणी २५ ते ३० फुटांपर्यंत शक्य होते. येथील माडाची झाडे जुन्या वाणांची उंचच उंच वाढणारी असल्याने ८० ते ९० फुटांपर्यंत फवारणी करणे शक्य होत नाही. माडांच्या झाडांवर चढून नारळ पाडणाऱ्या पाडेकऱ्यांचीच येथे वानवा असल्याने झाडांवर चढून औषध फवारणी करणे शक्य होत नाही. अशा विविध आस्मानी व सुलतानी संकटाने या कल्पवृक्षाला ग्रासले असून, कोणत्याही कार्यासाठी अग्रक्रमाने लागणाऱ्या या श्रीफळाला व त्याच्या वृक्षाला वाचविण्यासाठी सर्वस्तरातून प्रयत्न व्हायला हवेत.**

# दोन गटात हाणामारी

**। तळा । वार्ताहर**
तळा तालुक्यातील रहाटाड कोळीवाडा येथे मागील भांडणाच्या रागातून दोन गटात हाणामारी झाली असून, परस्परांविरुद्ध तळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, तालुक्यातील रहाटाड येथे ग्रामपंचायत कार्यालयात लक्ष्मी चांग्या पाटील यांच्या जागेच्या अर्जासंबंधी चौकशीसाठी उपस्थित असलेल्या दोन गटांमध्ये मागील भांडणाचा राग मनात धरून हाणामारी झाली. या हाणामारीत चांगदेव रामा पाटील यांच्या उजव्या डोळ्याच्या कोपऱ्यावर किरकोळ दुखापत झाली आहे. या घटनेबाबत तळा पोलीस ठाण्यात हाताबुक्क्याने मारहाण, शिवीगाळ व जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी परस्परांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

निवडक

## मारुती कारला भीषण आग

**पनवेल :** जेएनपीटी टी पॉईंटजवळ सोमवारी दुपारी एका मारुती गाडीला अचानकपणे लागलेल्या आगीत संपूर्ण गाडी जळून खाक झाली असून, सुदैवाने गाडीतील प्रवासी बचावले आहेत. पुणे बाजूकडून मुंबईकडे युसूफ जबलपूरवाला हे त्यांच्या ताब्यातील मारुती गाडी क्र.एमएच-१४-सीए-०१५७ ही घेऊन चालले होते. अचानकपणे गाडीच्या बोनेटमधून धूर येऊ लागल्याने त्यांनी गाडी बाजूला उभी करून ते गाडीच्या बाहेर पडले. त्यानंतर गाडीने पेट घेण्यास सुरूवात केली.

## तरुणाचा बुडून मृत्यू

**पनवेल :** पनवेल शहरातील कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीच्या स्विमींग पूलमध्ये पोहण्यासाठी गेलेल्या तरुणाचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. नवीन पनवेल येथील पंचशील नगर येथे राहणारा विजय भट (१९) हा त्याच्या मित्रासह कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीच्या स्विमींग पूलमध्ये पोहण्यासाठी गेला होता. त्यात त्याचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## मुख्यालयात दिली शपथ

**पनवेल :** माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधींच्या स्मृतींना वंदन करून पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात मंगळवारी (दि. २१) दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्ताने शपथ घेण्यात आली. यावेळी उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त मारुती गायकवाड, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, कार्यकारी अभियंता सुधीर साळुंखे, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अज्ञात इसमाचा मृतदेह

**पनवेल :** पनवेल : पनवेल परिसरात एका अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आला असून, त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल पोलीस करीत आहेत. शहरातील डोंबाळे कॉलेज रोड जाणाऱ्या रस्त्याच्या रेल्वे फाटकाच्या मागे क्रिष्ण सॉलिटीयर्स बिल्डींगच्या कंपाऊंडच्या बाजूला एका ६० ते ६५ वयोगटातील इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे ०२२-२७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे यांच्याशी संपर्क साधावा.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

**पनवेल :** एका अल्पवयीन मुलीचे अज्ञात इसमाने राहत्या घरातून अज्ञात कारणासाठी फूस लावून संमतीशिवाय पळवून नेल्याची घटना तालुक्यातील पेंधर गावात घडली आहे. रुबीकुमारी मुखिया असे या मुलीचे नाव आहे. रंग गोरा, उंची ४ फूट सहा इंच, केस काळे लांब, कानात बाजारु रिंग असून, अंगात लाल सलवार व काळी जिन्स पॅन्ट घातलेली आहे. या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी तळोजा पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक सुनील घरत यांच्याशी संपर्क साधावा.

# सागरी प्रवास महागणार

■ मोरा-भाऊचा धक्का तिकीट दरात २५ रुपयांनी वाढ
■ २६ मेपासून दरवाढ होणार लागू



**। उरण । वार्ताहर ।**
**मोरा (उरण) ते मुंबई (भाऊचा धक्का) या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक तिकीट दरात रविवार (दि. २६) पासून २५ रुपयांची वाढ होणार आहे. दरवर्षी पावसाळी हंगामासाठी ही दरवाढ केली जाते. यामुळे सागरी प्रवास दरवर्षीप्रमाणे महागणार आहे.**

दरवर्षी पावसाळी हंगामात (उरण) मोरा-मुंबई (भाऊचा धक्का) या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक तिकीट दरात वाढ केली जाते. मागील वर्षीही पावसाळी हंगामात तिकीट दरात वाढ करण्यात आली होती. यावर्षीही मुंबई जलवाहतूक औद्योगिक सहकारी संस्थेने पावसाळी हंगामासाठी तिकीट दरात ८० रुपयांवरुन १०५ रुपयांपर्यंत वाढ केली आहे. हाफ तिकीट दरातही ३९ रुपयांवरुन ५३ रुपयांपर्यंत म्हणजे ९ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. ही दरवाढ २६ मेपासूनच ३१ ऑगस्टपर्यंत लागू राहणार असल्याची माहिती मोरा बंदर निरीक्षक नितीन कोळी यांनी दिली.

दरवर्षी मोरा-भाऊचा धक्का या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक तिकीट दरात इंधन दरवाढीचे पावसाळी हंगामाचे कारण पुढे करत प्रत्येक पावसाळी हंगामात २० ते २५ रुपयांपर्यंत वाढ केली जाते. त्यानंतर वाढ करण्यात आलेली तिकीट दरवाढ उन्हाळी हंगामातही कायम ठेवली जाते. त्यानंतर पावसाळी हंगामात पुन्हा तिकीट दरवाढ केली जाते. मात्र, २०२२ सालीच्या पावसाळी हंगामानंतर हंगामी तिकीट दरात कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही.

## सुक्या मासळीच्या दरात वाढ

**उरण :** पावसाळ्यात मासेमारीवर बंदी असल्याने या काळात सुक्या मासळीवर अवलंबून राहावे लागते. मात्र, आवक घटल्याने सुक्या मासळीचे दर वाढू लागले आहेत. यावर्षी कोळंबीच्या सोड्याचे दर हे किलोला १ हजार ३०० रुपयांवर पोहोचले आहेत. महिनाभरावर पावसाळा आला असून, सुक्या मासळीच्या मागणीत वाढ झाली आहे. यामध्ये सर्वसामान्यांचे अन्न असलेले बोंबील आणि करंदीचे दर गगनाला भिडले आहेत. हे दर किलोला ६०० रुपयांवर पोहोचले आहेत. मात्र, तरीही किनारपट्टीवरील रहिवासी खिशाला चाट देत सुकी मासळी खरेदी करीत आहेत. समुद्रातील मासळीची आवक घटल्याने सुक्या मासळीचे प्रमाण कमी झाले आहे. या वाढत्या अडचणीमुळे सुक्या मासळीचाही दुष्काळ निर्माण झाला आहे.

# ‘अंबा’चे पाणी पिण्यास अयोग्य

■ प्रयोगशाळेतील तपासणीनंतर अहवाल सादर

**। नागोठण । वार्ताहर ।**
अंबा नदीच्या पाटणसई व वजरोली येथील पात्रात घातक रसायनामुळे मोठ्या संख्येने मासे मृत झाल्याची घटना चार दिवसांपूर्वी घडली होती. त्यानंतर अंबा नदीच्या पाण्याचे नमुने नागोठणे प्रा.आ. केंद्राकडून तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्याचा अहवाल आता प्राप्त झाला असून, सदरचे पाणी पिण्यास अयोग्य असल्याचा निष्कर्ष अलिबाग येथील वरिष्ठ भूवैज्ञानिक यांच्या कार्यालयांतर्गत असलेल्या उपविभागीय प्रयोगशाळा, रोहा यांनी नोंदविला आहे.

हा अहवाल प्राप्त झाला असला तरी कोकणभुवन येथे रासायनिक तपासणीसाठी पाठवलेला नमुना त्याचा अहवाल अद्याप मिळालेला नाही. लोकसभेच्या निवडणूक प्रक्रियेमुळे मुंबईतील प्रयोगशाळेला सुट्टी असल्यामुळे उद्या किंवा परवा हा अहवाल मिळणार आहे. त्यामुळे टीसीएलने जरी पाण्यातून जंतू मारले, तरी जर पाण्यात अजून केमिकल असेल, तर असे पाणी प्यायल्याने शरीराला इजा होऊ शकते म्हणून पाण्याचे योग्यरित्या शुद्धीकरण करूनच ते प्यावे वा प्राथमिक आरोग्य केंद्रात संपर्क साधावा, असे आवाहन नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रातून करण्यात आले आहे.

### नागरिकांना सूचना

**नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रातून अंबा नदीच्या या पाण्यासंदर्भात नागरिकांना सूचना करण्यात आल्या आहेत. त्यानुसार साठविलेल्या एक हजार लीटर पाण्यात पाच ग्रॅम टीसीएल पावडरचे द्रावण बनवून वरील निवळी शुद्धीकरणासाठी वापरावी. एक तासानंतर पाणी पिण्यासाठी वापरू शकता किंवा मेडिक्लोरचे ४ थेंब १० लीटर पाण्यात टाका व अर्ध्या तासानंतर पाणी पिण्यासाठी वापरा, असे सांगण्यात आले आहे.**

### अहवालात काय?

**भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा प्रयोगशाळेत पाठविण्यात आलेल्या पाण्याच्या प्रति १०० मि.मी. नमुन्यात १०० पेक्षा जास्त कोलिफोर्म आढळून आल्याने अंबा नदीतील हे पाणी थेटपणे पिण्यास अयोग्य व धोकादायक असल्याचे या अहवालात म्हटले आहे.**

# रायगडमध्ये ४९९ धोकादायक इमारती

## ४८२ घरांना बजावल्या नोटिसा

**। रायगड । प्रतिनिधी ।**
रायगड जिल्ह्यातील १५ नगरपालिका हद्दीत सद्य:स्थितीत ४९९ धोकादायक इमारती आहेत. त्यातील ४८२ धोकादायक इमारतींना नगरपालिका प्रशासनाने नोटिसा बजाविल्या आहेत. धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण सुरू केल्याची माहिती नगरपालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे. रहिवाशांना घर रिकामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील नगरपालिका हद्दीत ४९९ इमारती व घरे पालिकेने धोकादायक घोषित केली आहेत. त्या घरमालकांना पालिकेकडून नोटिसा बजाविण्यात आल्या आहेत.

पनवेल, कर्जत, उरण, महाड नगरपालिका हद्दीत सर्वाधिक धोकादायक इमारती आहेत. २०२४च्या सर्वेक्षणातून हाती लागलेल्या माहितीनुसार, सर्वाधिक धोकादायक इमारती व घरे पनवेल पालिका हद्दीत आहेत. पालिकेने २१५ जणांना नोटिसा बजाविल्या आहेत. त्याखालोखाल कर्जतमध्ये १५३ धोकादायक इमारती व घरे आहेत. उरण ६४, मुरुड ४, महाड ११, माथेरान ६, अलिबाग ९, रोहा ८, श्रीवर्धन ११ व खोपोली ३, म्हसळा ८, पेण ८ अशा एकूण ४९९ पालिका हद्दीत धोकादायक इमारती आहेत. २०२३ च्या सर्वेक्षणानुसार, इमारती धोकादायक ठरविण्यात आल्या आहेत.

### वारंवार दिल्या नोटिसा

**धोकादायक इमारतींमुळे कोणतीही आपत्ती निर्माण होऊ नये म्हणून इमारत मालकांना नोटिसा बजावत त्या खाली करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, आदेशाची अंमलबजावणी केल्याचे दिसून आलेले नाही. वारंवार नोटिसा देऊन कोणतीही कार्यवाही होत नसेल तर यावर विचारविनिमय होणे आवश्यक आहे.**

### इमारत पडल्यास जबाबदार कोण?

**महाड दुर्घटनेनंतर जिल्हा प्रशासन धोकादायक असलेल्या इमारती खाली करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहे. मात्र, नागरिकांकडून प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे एखादी दुर्घटना झाली तर त्यास जबाबदार कोण, असा प्रश्न उभा राहत आहे.**

## बाजारात लिचीची आवक वाढली

**नवी मुंबई :** हापूसचा हंगाम शेवटच्या टप्प्यात असून, इतर फळांच्या हंगामाला सुरुवात होत आहे. बाजारात आता लिचीची आवक होण्यास सुरुवात झाली आहे. मे महिनाअखेरपर्यंत हापूसचा हंगाम संपतो. त्यानंतर बाजारात पावसाळी फळांचा हंगाम सुरू होतो. मे महिन्यात बाजारात लिची दाखल होण्यास सुरुवात होत असते. सध्या बाजारात १५००-१६०० पेट्या दाखल होत असून, दोन दिवसांत आवक वाढून तीन हजार पेटी आवक होईल, अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे.सध्या बाजारात पश्चिम बंगालमधून लिची दाखल होत आहे. लिची ही उष्ण वातावरणात लवकर खराब होते.

# एनडीआरएफकडून आपत्कालीन प्रशिक्षण

## जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार कार्यक्रम हाती



**। रायगड । प्रतिनिधी ।**
आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजनाबाबत जनजागृतीसाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ)च्या सहभागाने विविध शासकीय विभागाचे अधिकारी-कर्मचारी यांना प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण आज देण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत भूस्खलन, पूर परिस्थिती काळात करावयाच्या उपाययोजना व प्रथमोपचार, पद्धत, रस्त्यावरील अपघात काळात करावयाच्या उपाययोजना व प्रथमोपचार, वायूगळती आपत्तीवर उपाययोजना या विषयांवर प्रात्यक्षिके करण्यात आली. जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे सूचनेनुसार व मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात विविध ठिकाणी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, एनडीआरएफ पुणे, तहसीलदार कार्यालय पनवेल व सी.के.टी. महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्तीविषयक जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या अंतर्गत पनवेल येथे आयोजित प्रशिक्षणासाठी तहसीलदार पनवेल विजय पाटील, निवासी नायब तहसीलदार संभाजी शेलार हे उपस्थित होते. प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये महेंद्र पुनिया-सिनीयर इन्स्पेक्टर व जालिंदर फुंदे-सिनियर इन्स्पेक्टर यांच्या पथकाकडून प्रशिक्षण देण्यात आले. तहसीलदार विजय पाटील यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. निवासी नायब तहसीलदार संभाजी शेलार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करीत उपस्थितांचे आभार व्यक्त केले. नागरी संरक्षण दल, उरणचे श्री. म्हात्रे व त्यांचे पथक सदर कार्यक्रमास उपस्थित होते. सदर प्रशिक्षणासाठी पनवेल व उरण तालुक्यातील विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी, मंडळ अधिकारी, तलाठी, आपदा मित्र, ग्रामसेवक, सरपंच, पोलीस पाटील, कोतवाल असे १५० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. या प्रशिक्षणास सी.के.टी. महाविद्यालय प्राचार्य श्री. पाटील व एनएसएस प्रमुख आकाश पाटील यांचे सहाकार्य लाभले.

# ठाकरे गटाचे खंडेरायाला साकडे

**। पनवेल । वार्ताहर ।**
नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रातून उभ्या करण्यात आलेल्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सर्वच उमेदवार विजयी व्हावेत यासाठी शिवसेना रायगड जिल्हा संपर्कप्रमुख बबन पाटील यांनी जेजुरी येथे खंडेरायाला साकडे घातले आहे. बबन पाटील यांनी शिवसैनिकांच्या साथीने जेजुरी येथे जाऊन खंडोबाचा गोंधळ घातला व पुन्हा एकदा महाराष्ट्रात भगवा फडकवू दे व लोकसभा निवडणुकीमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सर्व उमेदवार विजयी व्हावेत, असे साकडे घातले आहे.





# माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**
संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे स्वर्गीय नामदेव शेठ खैरे सभागृहात शिक्षणशास्त्र महाविद्यालयबार्शीयेथीलबीपीएडच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा रविवार, दि.१९ मे रोजी उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सुधागड तालुका गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे, सुएसो सचिव रविकांत घोसाळकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जगदीश सुतार, राष्ट्रीय पंच भगवान शिंदे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते संदीप गुरव, प्राचार्य संभाजी ढोपे आदी मान्यवर उपस्थित होते.

माजी विद्यार्थी पी.जी. धनवे यांनी आपल्या प्रास्ताविकात आम्ही सर्व मित्र कोरोनाच्या काळात एकत्र आलो. आज पर्यंत आमच्या बॅचचे ९० टक्के शिक्षक सेवानिवृत्त झाले आहेत. आमच्या बॅचचा आज तिसरा स्नेहमेळावा रायगडच्या भूमीत होत आहे, याच मला खूप आनंद होतो आहे. आमच्या बॅचच्या शिक्षकवृंदानी राष्ट्रीयपातळीवर असंख्य खेळाडू घडविण्यात मोलाचे योगदान दिले आहे. या बॅचच्या माजी विद्यार्थी बागमारू यांनी सर्व उपस्थित मित्रांना स्नेहपूरक भेट म्हणून सोलापूर चादर दिली. या कार्यक्रमादरम्यान बॅचच्या माहिती पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले.

माजी विद्यार्थ्यांनी आपल्या जुन्या आठवणीना उजाळा दिला, शिक्षक म्हणून आलेले अनुभव सांगितले तसेच यातील बहुसंख्य मित्रांना जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य सरकारच्या विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे, हे त्यांच्या मनोगतातून सांगण्यात आले. या कार्यक्रमाचे सर्व नियोजन निमत्रक संभाजी ढोपे यांनी केले.

# आंबा विक्रीवर अवकाळीचा परिणाम

## बागायदारांमध्ये चिंतेचे वातावरण

**। रायगड । प्रतिनिधी ।**
दोन दिवस पडलेल्या अवकाळी पावसाचा फटका जिल्ह्यातील आंबा पिकावर बसला. तयार होण्याच्या मार्गावर असलेला आंबा अवकाळी पावसामुळे खराब झाला. काही ठिकाणी आंबे गळून पडले आहेत. एकतर, यंदा रायगड जिल्ह्यातील हापूस आंबा बाजारात उशिरा आला आहे. त्याचा परिणाम आंबा विक्रीवर झाला आहे.



रायगड जिल्ह्यामध्ये १४ हजार हेक्टर आंब्याचे क्षेत्र असून, १२ हजार हेक्टर उत्पादनाचे क्षेत्र आहे. जिल्ह्यात सुमारे दीड लाख शेतकरी आंबा उत्पादक आहे. दरवर्षी आंबा विक्रीतून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. यंदा सुरुवातीला आंब्यासाठी वातावरण पोषक होते. आंब्याला मोहोर येऊन कैऱ्यादेखील तयार होण्याची प्रक्रिया सुरु झाली होती. परंतु, मार्च महिन्यात काही ठिकाणी तुडतुड्या रोगाचा प्रदुर्भाव आंब्यावर पडला. दोन दिवस अवकाळी पाऊस पडला. त्यामुळे बाजारात येणारा रायगड जिल्ह्यातील आंबा उशिरा दाखल होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा ३० टक्क्यांपेक्षा अधिक उत्पादनावर परिणाम होण्याची भीती आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

प्रामुख्याने एप्रिल ते मेदरम्यान खवय्यांना कमी दराने आंबा खरेदी करायला मिळतो. परंतु, यावर्षी हापूस आंब्याचे दर चढते पाहायला मिळण्याची शक्यता आहे. रायगडमधील हापूस आंब्याचा तुटवडा भासत असल्याने सध्या आंब्याची पेटी २००० ते २५०० विकली जात आहे.

> **यंदा आंबा उत्पादनावर अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. बाजारात रायगड जिल्ह्यातील आंबा उशिरा दाखल होऊ लागला आहे. त्यामुळे आंब्याचे दर वाढण्याची भीती आहे. आंबा विक्रीवर तीस टक्क्यांपेक्षा अधिक परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.**
> **- चंद्रकांत मोकल, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघ**

> **आंब्याचे उत्पादन समाधानकारक होते. आंबा काढणीच्या तयारीत असताना अचानक अवकाळी पाऊस जिल्ह्यातील अनेक भागात कोसळला. वारा पावसामुळे आंब्यांना गळती लागली. त्याचा परिणाम आंबा उत्पादनावर झाला आहे. रुळे, पवेळेसह अनेक गावांमधील शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. शासनाने नुकसानभरपाई देण्याबाबत कार्यवाही करावी.**
> **- राम पाटील, आंबा उत्पादक**

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, कृष्णा शालिनी अपार्टमेंट पहिला मजला रूम नं.१०३, घरत आळी, एस.टी.स्टँडजवळ, अलिबाग/रायगड

● शिवानी पेटशॉप अलिबाग येथे कामाकरीता कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे ९२७२३८३४७६

● फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी/१२ वी पास/नापास मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ८ तास ड्युटी, ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार-१०,००० महिना.
Contact- ९०४९६५५५२३


● बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९

● टायपिंग आणि झेरॉक्स करीता मुले मुली पाहिजेत
संपर्क - ९९२२५८२५८०

● अलिबाग मधील ऑफिसकरीता एक्सपेरिएंस्ड ड्राफ्ट्समन, आर्किटेक्ट, इंटीरियर डिझायनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# रायगडच्या किनाऱ्यांमुळे स्थानिकांची भरभराट



## हक्काच्या रोजगाराने उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटला

*। रायगड । प्रतिनिधी।*
***सुमद्रकिनाऱ्यावर वसलेल्या रायगडचे पर्यटन वाढत असून, येथील सुमद्रकिनारे यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. हे किनारे स्थानिकांना रोजगार देत आहेत. त्यामुळे स्थानिक व्यावसायिकांची भरभराट झाली असून, त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न कायमचा मिटला आहे. तरी, येथील सुविधांत वाढ केल्यास पर्यटक वाढतील, अशी अपेक्षा पर्यटकांकडूनही व्यक्त होत आहे.***

*रायगड जिल्ह्याला ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि औद्योगिकदृष्ट्या महत्त्व आहे. तसेच हा जिल्हा पर्यटनदृष्ट्याही महत्त्वाचा आहे. या जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात अलिबाग, सारळ, सासवणे, आवास, किहीम, वरसोली, आक्षी, नागाव, चौल आणि रेवदंडा तसेच मुरुड तालुक्यातील काशिद, मुरुड, आगरदांडा, राजपुरी, तर श्रीवर्धन तालुक्यातील श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दिवेआगर, शेखाडी, बागमांडला, दिघी येथे समुद्रकिनारे पर्यटकांना आकर्षित करीत आहेत. या समुद्रकिनाऱ्यांवर पाऊस वगळता पर्यटकांची वर्दळ कायम असते. काही वर्षांपूर्वी हे किनारे फारसे गजबजलेले नसायचे; परंतु प्राचीन लेणी, गडकिल्ले, समुद्रकिनारे, वॉटर स्पोर्ट्स, धरणे, बंदरे, धबधबे, गिरीस्थाने, अभयारण्य, ऐतिहासिक धार्मिक स्थळे आदी पर्यटनस्थळांवर गर्दी वाढू लागली आहे.*

*स्थानिकांनी लॉजिंग बोर्डिंगसह व्हेज-नॉनव्हेज उपाहारगृहे, बोटिंग, विविध प्रकारची कटलरी सामान, लाँचसेवा, रो-रो सेवा, कोकण फूड बाजार, भेलपुरी, पाणीपुरी, कुल्फी, गोळा व सरबत, नारळ पाणी, ताडगोळे, सुकी मासळी, विविध प्रकारच्या टोप्या, चहा-नाश्ता, लहान मुलांची खेळणी आदी व्यवसाय किनाऱ्यांवर सुरू झाल्याने पर्यटकांची सोय होण्याबरोबरच स्थानिकांना बऱ्यापैकी रोजगार उपलब्ध होत आहे.*

*वर्षभरात कोट्यवधींची उलाढाल होत आहे. कोरोना काळात दोन वर्षे शासनाने पर्यटकांना बंदी घातल्याने जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांसह सर्वच व्यवसाय ठप्प होते. यामुळे येथील व्यावसायिक कर्जबाजारी झाले होते. कामगारांना पगारही देता येत नसल्याने रोजंदारीवर काम करणाऱ्यांच्या कुटुंबावरही उपासमारीची वेळ आली होती.*

> पर्यटनस्थळांच्या विकासाबरोबरच पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या रुंदीकरणाबरोबरच समुद्रकिनारा, धार्मिक, ऐतिहासिक पर्यटनस्थळे येथील मूलभूत सोयीसुविधांचा प्रश्न सोडविल्यास पर्यटकांची संख्या अधिक वाढू शकेल.
> - भारती पाटील, पर्यटक

> कोरोनाची बंदी उठल्यानंतर पर्यटनवाढीला चालना मिळाली आहे. त्यामुळे व्यवसायाने परत एकदा उभारी घेतली. मागील चार महिन्यांत पर्यटकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळाला आहे.
> - मंदार पावशे, स्थानिक व्यावसायिक

# अपघात रोखण्यासाठी पोलीस अलर्ट मोडवर

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

पावसाळ्यात मुंबई पुणे एक्स्प्रेस वेवर होणारे अपघात रोखण्यासाठी आयआरबी, वाहतूक पोलीस आणि विविध कंपन्यांची आढावा बैठक पार पडली. हे अपघात रोखण्यासाठी महामार्ग पोलीस अलर्ट मोडवर आले असून उपाय योजना करण्यासाठी सज्ज झाले आहेत.

ही बैठक आयआरबी कॉन्फरन्स हॉल खालापूर, टोलनाका येथे पार पडली.मुंबई पुणे एक्स्प्रेस वेवर पावसाळ्यात दरड कोसळणे, वाहने घसरून अपघात होणे, पूर परिस्थिती, रस्त्यांची प्रलंबीत कामे, वाहतूक कोंडी यावर उपाय योजनेबाबत बैठक पार पडली. यात सर्वच यंत्रणांना अलर्ट राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या बैठकीला पोलीस अधीक्षक रायगड परीक्षेत्र तानाजी चिखले, पोलीस उपअधीक्षक घनश्याम पलंगे, पोलीस निरीक्षक पनवेल, रायगड विभाग प्रभारी अधिकारी आणि कर्मचारी हजर होत. या बैठकीत करण्यात आलेल्या प्रलंबित कामाविषयी सूचना देण्यात आल्या असून त्यांचे १५ दिवसांच्या आत केलेल्या कारवाईचा अहवाल मागविण्यात आला आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालकांकडून खरेदी घेणेचा करार केला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, अलिबाग नगरपरिषद हद्दीतील :-**

| विदयमान मालकाचे नाव | सिटी सर्व्हे प्रॉपर्टी क्रमांक | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| निरूपा मोहनलाल पारेख | १/६/ब/१/१/अ/१/२/३ | २३० |
| निरूपा मोहनलाल पारेख | १/६/ब+१/१/२/अ | ७७०.८० |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- २१/०५/२०२४

**ॲड. रविंद्र वि. ओक**
''गुरूकृपा'', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या मौजे बोरघर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकती, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रायोमंड पटेल यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

| अनु. | मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार(रू.पै.) | मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | बोरघर | २०९ | ०-१२-०० पो.खा. ०-०६-०० एकुण ०-१८-०० | ०.२२ | श्री. रायोमंड पटेल |
| २. | बोरघर | २६२/१ | ०-१३-४० पो.खा. ०-०६-६० एकुण ०-२०-०० | ०.२४ | |
| ३. | बोरघर | २७३ | ०-१४-०० पो.खा. ०-०७-०० एकुण ०-२१-०० | ००.२६ | |
| ४. | बोरघर | २९१ | ०-०९-०० पो.खा.०-०४-०० एकुण ०-१३-०० | ००.१७ | |

सदरच्या सर्व मिळकती हया विद्यमान मालकांचे निर्वेध मालकीहक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
ता. २२/०५/२०२४

**ॲड. विधान अरविंद पाटील**
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्यांचे विद्यमान मालक जगन मालु ठाकरे रा. सावरगाव, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :

**मौजे सावरगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|
| २१ | १-५५-१० पो.ख. ०-०७-८० एकूण १-६२-९० यापैकी जगन मालु ठाकरे ०-२९-०० इतक्या क्षेत्रापुरते | ४-१३ |

सदरची शेतजमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील लहान मोठी झाडे तदूंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशीलांस विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा करार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.
कळावे.

दिनांक : २२/०५/२०२४

अशिलांतर्फे ॲडव्होकेट
**ॲड. प्रविण गजानन चव्हाण**
मु. डिकसळ, ता. कर्जत,
जि. रायगड मो.नं.८२३७१०१७१८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसी व्दारे कळविण्यात येते की, **सागंवी** ता. कर्जत जिल्हा रायगड येथिल खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे आशील **प्रियांका राजेश पाटील व ईतर** हे **हनुमंत गजानन दुर्गे** या विदयमान मालकाकडुन खरेदी घेण्याचे ठरवले आहे

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं हिस्सा नं | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १०/१०/अ | ०-३२-६५ गुंठे पैकी ०-१६-०० गुंठे | २-३९ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री, गहाण, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, वारस हक्क, पोटगी, लीजचार्ज, ताबा, वहीवाट, अथवा कोणताही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत नोंदवावी. सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
२२/०५/२०२४
मो. नं ९२८४६७७५१६

आशीलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मु. पो. कोंदीवडे ता कर्जत
जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्यांचे विद्यमान मालक एकनाथ गणपत मसणे रा. आंबोट, ता. कर्जत, जि.रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :

**मौजे आंबोट, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १६ | २ क | ०-१५-०० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-१६-०० | ०-८० |

सदरची शेतजमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील लहान मोठी झाडे तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशीलांस विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा करार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.
कळावे.

दिनांक : २२/०५/२०२४

अशिलां तर्फे ॲडव्होकेट
**ॲड. प्रविण गजानन चव्हाण**
मु. डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड मो.नं.८२३७१०१७१८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसी व्दारे कळविण्यात येते की, **हुमगाव** ता. कर्जत जिल्हा रायगड येथिल खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे आशील **सुशिल कुमार गुप्ता व ईतर** हे **केतन दलपत शहा** या विदयमान मालकाकडुन खरेदी घेण्याचे ठरवले आहे

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ८२ | १ | ०.८६.८० | १.०० |
| २ | १ | ०.७२.३० | ३.०९ |
| ८१ | १ | ०.२३.०० | ०.१७ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विकी, गहाण, भाडेपटटा, बक्षीसपत्र, वारस हक्क ,पोटगी, लीजचार्ज, ताबा, वहीवाट, अथवा कोणताही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत नोंदवावी. सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
२२/०५/२०२४
मो. नं ९२८४६७७५१६

आशिलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मु. पो. कोंदीवडे ता. कर्जत
जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी **मौजे-वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड** येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची मिळकत असून, आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**- जमीन मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे - वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्री. सुधिर पांडुरंग बाबरे | ७५/१ | ०.५२.१० यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०.२०.०० | २.५२ |

**वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुध्दा.**

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक श्री. सुधिर पांडुरंग बाबरे यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन मालकी हक्काचे प्रमाणपत्र व ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत
दिनांक: २२/०५/२०२४

सही/-
**ॲडव्होकेट, मिनाक्षी जगन्नाथ भासे**
शॉप नं. १६, श्री नेमीनाथ हाईट्स
पत्ता-मुद्रे (बुद्रुक), ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विदयमान मालक शैलेश माधव चांगले यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मौजे मोठे वेणगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे . आर. पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| १५३ | १० | ०-१८-०० पैकी ०-०९-०० इतके लिहून देणार यांचे मालकीचे विकत दिलेले क्षेत्र | ०-१७ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २२/०५/२०२४
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्यांचे विद्यमान मालक **आप्पा सखाराम आगज वगैरे ४ रा. आंबोट, ता. कर्जत, जि.रायगड** यांचेकडुन विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :

**मौजे आंबोट, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १६ | २ | ०-५५-०० पो.ख. ०-०१-३० एकूण ०-५६-३० | २-९५ |

सदरची शेतजमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील लहान मोठी झाडे तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशीलांस विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा करार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.
कळावे.

दिनांक : २२/०५/२०२४

अशिलां तर्फे ॲडव्होकेट
**ॲड. प्रविण गजानन चव्हाण**
मु. डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड मो.नं.८२३७१०१७१८

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे खारसापोली, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक अर्चना लक्ष्मण पाटील व इतर यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| खारसापोली | ४८/५ | ०.३२.०० पो.ख. ०.०२.०० एकूण क्षेत्र ०.३४.०० | ०.५८ |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.
टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही/-
ठिकाण : पेण
दि.२२/०५/२०२४

**ॲड. हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
साई श्रध्दा सबुरी बिल्डिंग बी-विंग,
ब्लॉक नं. ००२ प्रभु आळी, पेण

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे खारसापोली, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक जालेंद्र दिनकर पाटील यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| खारसापोली | ४८/८ | ०.२१.०० पो.ख. ०.०२.०० एकूण क्षेत्र ०.२३.०० | ०.३७ |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.
टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही/-
ठिकाण: पेण
दि.२२/०५/२०२४

**ॲड. हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
साई श्रध्दा सबुरी बिल्डिंग बी-विंग,
ब्लॉक नं. ००२ प्रभु आळी, पेण

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी **मौजे-तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड** येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची मिळकत असून, आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**- जमीन मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे - तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्री. अनंत खंडु ठोंबरे | १५/४/क | ०.२१.२० | ३.५५ |

**वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुध्दा.**

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.


विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक श्री.अनंत खंडू ठोंबरे यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन मालकी हक्काचे प्रमाणपत्र व ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत
दिनांक: २२/०५/२०२४

सही/-
**ॲडव्होकेट. मिनाक्षी जगन्नाथ भासे**
शॉप नं. १६, श्री नेमीनाथ हाईट्स
पत्ता- मुद्रे (बुद्रुक), ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग*
*दागिने-नविन डिझाइन्स*



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीनें कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. तुळशीराम लक्ष्मण कोळी, रा. मु. बोडणी, पो. सारळ, अलिबाग-रायगड यांनी खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री.आत्माराम लक्ष्मण पाटील वगैरे १०, सर्व रा. नवेदर बेली, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडुन कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या भातशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे | भूमापन क्रमांक | एकूण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|---|
| १. | ढवर, ता. अलिबाग, जि. रायगड | ४७३ | ०-१८-७० ०-०२-३० पो.ख ०-२१-० एकूण | २.१९ |

सदरहू मिळकत निर्वेध व बोजारहीत असलेचे विद्यमान मालकांचे म्हणणें आहे. तरी देखील वर नमूद मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, चार्ज, पोटगी, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास अगर सदर मिळकती संदर्भात कोणत्याही न्यायालयात वाद प्रलंबित असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८(आठ) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेकरीता खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

ता. २२/०५/२०२४.

सही/-
**ॲड. विजय वि. पाटील**
मु.F-१०४, ॲकॉन्स एन्क्लेव्ह, पहिला मजला,
ता. अलिबाग, जि. रायगड, (मोबाईल ०९७६७५२८८८०)

## जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक १. सुधाकर पांडूरंग आंबवणे २. अलका सुधाकर आंबवणे यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

मौजे साळोख तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत तिचे महसुल दफ्तरी वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**परिशिष्ट**

| | | |
|---|---|---|
| २१/११ | ०.०७.०० | ०.०३ |
| २१/१४ | ०.१०.०० | ०.०५ |
| २१/१६ | ०.०६.०० | ०.०३ |
| २४/५ | ०.०९.०० | ०.०९ |
| २४/७ | ०.०१.०० | ०.०२ |
| ३१/१ | ०.००.२० | ०.०३ |
| ३२/१४ | ०.३९.०० | ०.२ |
| ३२/१५ | ०.१६.०० | ०.११ |
| ३२/१६ | ०.२६.०० | ०.२२ |
| ३२/२१ | ०.२१.०० | ०.२३ |
| ३२/३२ | ०.१२.०० | ०.०९ |
| ३२/३५ | ०.११.०० | ०.०५ |
| ३२/५/अ | ०.०३.०० | ०.०२ |
| ३२/५/ब | ०.०२.०० | ०.६१ |
| ३२/६ | ०.२६.०० | ०.०२ |
| ३२/७ | ०.१८.०० | ०.११ |
| २१/१० | ०.११.०० | ०.०५ |
| २१/१२ | ०.०९.०० | ०.०५ |
| २१/१५ | ०.०५.०० | ०.०३ |
| २१/८ | ०.२९.०० | ०.११ |
| २१/९ | ०.२१.०० | ०.११ |
| २३/२ | ०.१६.५० | ०.१४ |
| २३/४ | १.०७.२० | १०.८८ |
| २३/५ | ०.२५.०० | ०.२५ |
| २३/७ | ०.२५.०० | ०.२५ |
| २४/४ | ०.४२.३० | ०.४५ |
| ३०/१/ब | ०.२१.०० | २.३४ |
| ३०/४ | ०.१७.७० | ०.२५ |
| ३१/२ | ०.३७.७० | १.३१ |
| ३२/१ | ०.०३.०० | ०.०३ |
| ३२/१० | ०.४९.०० | ०.६४ |
| ३२/११ | ०.२१.०० | ०.१९ |
| ३२/१२ | ०.२२.०० | ०.११ |
| ३२/१३ | १.०७.०० | १.०७ |
| ३२/१८ | ०.०४.०० | ०.०२ |
| ३२/२ | ०.०८.०० | ०.०९ |
| ३२/२० | ०.११.०० | ०.०५ |
| ३२/२२ | ०.१७.०० | ०.२८ |
| ३२/२३ | ०.११.०० | ०.०६ |
| ३२/२४/अ | ०.१६.०० | ०.२७ |
| ३२/२४/ब | ०.१५.०० | ०.२३ |
| ३२/२५/अ | ०.०९.०० | ०.१६ |
| ३२/२५/ब | ०.०७.०० | ०.११ |
| ३२/२६ | ०.१५.०० | ०.१४ |
| ३२/२७ | ०.३७.०० | ०.२५ |
| ३२/२८ | ०.१५.०० | ०.०८ |
| ३२/२९ | ०.२०.०० | ०.१२ |
| ३२/३ | ०.०५.०० | ०.०३ |
| ३२/३० | ०.०६.०० | ०.०८ |
| ३२/३१/अ | ०.९३.०० | ०.८९ |
| ३२/३१/ब | ०.३५.०० | ०.३७ |
| ३२/३३ | ०.१४.०० | ०.११ |
| ३२/३४ | ०.१४.०० | ०.०६ |
| ३२/४ | ०.५९.०० | ०.५१ |
| ३२/८ | ०.४२.०० | ०.१७ |
| ३२/९ | ०.३२.०० | ०.४२ |
| २४/१/अ | ०.३४.३० | २.९२ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व ईतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक: २२/५/२०२४

**ॲड. उमेश आनंद भगत**
(अधिवक्ता)
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

**निवडक**

### श्रमाचं फळ मिळालं

**चेन्नई :** सध्या चेन्नईचा बेबी मलिंगा मथिशा पथिरानाला चांगले दिवस आले आहेत. यंदाच्या हंगामात चेन्नईकडून दमदार कामगिरी करत त्याने सर्वांचे लक्ष वेधले. त्याची वर्णी श्रीलंकेच्या टी-२० वर्ल्डकप संघात देखील लागली आहे. आता त्याने लंका प्रीमियर लीगच्या लिलावात इतिहासच रचला. तो लंका प्रीमियर लीगच्या चार वर्षाच्या इतिहासातील सर्वात मोठी बोली लागलेला खेळाडू ठरला आहे. विशेष म्हणजे कोलंबो स्ट्राईकर्सने त्याला सीएसकेपेक्षा ८० लाख रूपये जास्त दिले आहेत.

### इंग्लंडला मोठा धक्का

**नवी दिल्ली :** विश्वचषकाला अवघ्या दोन आठवड्याचा कालावधी शिल्लक राहिला आहे. त्याआधी इंग्लंडचा संघ पाकिस्तानविरोधात टी-२० सामन्याची मालिका खेळणार आहे. पण त्याआधीच इंग्लंडला मोठा धक्का बसला आहे. इंग्लंडचा कर्णधार जोस बटलर याला दुखापत झाली आहे. इंग्लंड-पाकिस्तान टी-२० मालिकेत जोस बटलर बेंचवरच बसण्याची शक्यता आहे. जर दुखापतीमुळे जोस बटलर विश्वचषकातून बाहेर पडला, तर हा इंग्लंडसाठी मोठा धक्का मानला जाईल.

### भज्जीला व्हायचेय प्रशिक्षक

**नवी दिल्ली :** आगामी टी-२० विश्वचषकानंतर भारतीय संघाचे मुख्य कोच म्हणून राहुल द्रविड यांचा कार्यकाळ संपणार आहे. राहुल द्रविडने कार्यकाळ वाढवण्यास नकार दिला आहे. त्यामुळे बीसीसीआयकडून नव्या कोचचा शोध घेतला जात आहे. स्टिफन फ्लेमिंग आणि गौतम गंभीर यांची नावे चर्चेत होती. आता यामध्ये आणखी एक नाव जोडले आहे. भारताचा माजी फिरकी गोलंदाज हरभजन सिंह यानेही भारतीय संघाच्या हेड कोचसाठी तयारी सुरु केली आहे. त्याने बीसीसीआयने इच्छा व्यक्त केली.

### संघाचे नेतृत्व मेस्सीकडे

**नवी दिल्ली :** अर्जेंटिना फुटबॉल असोसिएशनने आगामी कोपा अमेरिका स्पर्धेसाठी प्राथमिक २९ जणांच्या संघाची घोषणा केली आहे. अर्जेंटिना फुटबॉलने दिलेल्या माहितीनुसार दोन आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामने आणि कोपा अमेरिका २०२४ स्पर्धेसाठी संघाची घोषणा करण्यात आली आहे. अर्जेंटिना संघाचे नेतृत्व लिओनल मेस्सीकडे सोपवण्यात आले आहे. त्यामुळे २१ जूनपासून सुरु होणाऱ्या कोपा अमेरिका स्पर्धेतही पुन्हा एकदा मेस्सी नेतृत्व करताना दिसणार आहे.

### दिप्तीने रचला इतिहास

**नवी दिल्ली :** भारताच्या दीप्ती जीवनजीने जपानमधील कोबे येथे झालेल्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये महिलांच्या ४०० मीटर टी-२० शर्यतीत ५५.०७ सेकंदांच्या विश्वविक्रमासह सुवर्णपदक जिंकले. यासोबतच दीप्ती जीवनजी हिला पॅरिस ऑलिम्पिकनंतर होणाऱ्या पॅरालिम्पिक स्पर्धेचा कोटाही मिळाला आहे. पॅरा वर्ल्ड चॅम्पियनशिपच्या ट्रॅक इव्हेंटमध्ये प्रथमच भारतीय खेळाडूने सुवर्णपदक जिंकले आहे. दीप्ती जीवनजीने अमेरिकेच्या ब्रायना क्लार्कचा विश्वविक्रम मोडला.

# रायगडच्या तीन मुलींची सुपर लीगसाठी निवड

**२३ तारखेला कोल्हापूर, जळगाव येथे खेळणार**





**। कर्जत । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्यावतीने नुकतीच पुणे इथे १९ वर्षाखालील मुलींची आमंत्रित लेदर बॉल क्रिकेट स्पर्धा भरविण्यात आली होती. या सपर्धेत चांगली कामगिरी करणाऱ्या मुलींची सुपर लीग स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते आणि प्रशिक्षक मनीषा अडबल यांच्या मार्गदर्शनाखाली या मुली आता पुढे क्रिकेट असोसिएशनचे नाव उज्वल करण्यासाठी २३ तारखेला खेळण्यासाठी जाणार आहेत. या तिघींपैकी दोन मुली कोल्हापूर येथे तर एक मुलगी जळगाव येथे खेळण्यासाठी जाणार आहे.

पुणे येथे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्यावतीने १९ वर्षांखालील मुलींच्या आमंत्रित क्रिकेट स्पर्धा भरविण्यात आल्या होत्या. यामध्ये रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनकडून संघ पाठवण्यात आला होता. यावेळी रायगड संघाने तीन सामन्यांपैकी एकाच सामन्यात विजय मिळवला होता. यामध्ये गोलंदाजीत पेस बॉलर अंजली गोडसेने तर स्पिनर समिधा तांडेल आणि ऑलराउंडर रोशनी पारधीने चांगली कामगिरी केल्याने या तिघींची सुपर लीगसाठी निवड करण्यात आली आहे.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनकडून रायगड जिल्ह्यात मुलींच्या क्रिकेट लीगला गेल्या तीन वर्षांपासून सुरवात करण्यात आली आहे. गेली तीन वर्षापासून असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते, संदिप पाटील आणि प्रशिक्षक तथा टीम मॅनेजर मनीषा अडबल हे खूप मेहनत घेत आहेत. निवड झालेल्या तिघिंपैकी रोशनी पारधी (महाड) आणि समिधा तांडेल (खोपोली) या कोल्हापूर येथे तर अंजली गोडसे (पनवेल) ही जळगाव येथे सुपर लीग स्पर्धा खेळण्यासाठी जाणार आहेत.

## निवडकर्त्यांच्या पायाला हात लावणार नाही: गंभीर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

माजी क्रिकेटपटू गौतम गंभीर आयपीएल २०२४ मध्ये कोलकाताचा मेंटर म्हणून काम करत आहे. गौतम कोलकातामध्ये परतल्यानंतर या हंगामात संघाच्या कामगिरीत मोठा बदल झाला आहे. संघाचा क्वालिफायर १ सामना हैदराबादसोबत होणार आहे. याचे श्रेयही बऱ्याच अंशी गौतम गंभीरला जाते. गौतम अनेकदा आपल्या वक्तव्यांमुळे चर्चेत असतो. पुन्हा एकदा गौतमने भारतीय संघाच्या निवडकर्त्यांबाबत असे वक्तव्य केल्याने त्याच्या या वक्तव्याची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. गौतम गंभीरने फिरकी गोलंदाज आर. अश्विनसोबत एका चॅट शोमध्ये सांगितले की, जेव्हा मी माझ्या पहिल्या अंडर-१४ स्पर्धेसाठी प्रयत्न केला तेव्हा निवडकर्त्यांच्या पायांना स्पर्श न केल्यामुळे माझी निवड होऊ शकली नाही. त्या वेळी मी १३ किंवा १४ वर्षांची असेल. त्यानंतर मी स्वत:ला वचन दिले की मी कधीही निवडकर्त्यांच्या पायाला हात लावणार नाही. आजही मी खेळाडूंना माझ्या पायांना हात लावू देत नाही.

## नीता अंबानींचा खास मेसेज



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आयपीएल स्पर्धेतील साखळी फेरीतील सर्व ७० सामने खेळून झाले आहेत. त्यामुळे अंतिम ४ संघही निश्चित झाले आहेत, तर सहा संघांचे आव्हान संपले आहे. या सहा संघांमध्ये पाचवेळचे आयपीएल विजेत्या मुंबई संघाचाही समावेश आहे. मुंबईसाठी यंदाचा हंगाम अत्यंत निराशाजनक राहिला. मुंबईला आयपीएलच्या १७ व्या हंगामात १४ सामन्यांपैकी केवळ ४ सामने जिंकता आले. त्यांनी १० सामन्यांमध्ये पराभव स्विकारला. त्यामुळे त्यांना केवळ ८ पॉइंट्सच मिळवता आले. त्यामुळेच मुंबई पॉइंट्स टेबलमध्ये सर्वात शेवटच्या क्रमांकावर राहिले.

दरम्यान, मुंबईने शेवटचा सामना खेळल्यानंतर ड्रेसिंग रुममधील एक व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओमध्ये मुंबईची संघमालकीण नीता अंबानी यांनी खेळाडूंशी संवाद साधलेला दिसत आहे. त्यांनी म्हटले की, हा आपल्या सर्वांसाठीच निराशाजनक हंगाम होता. आपल्याला जशा गोष्टी हव्या होत्या, तशा त्या झाल्या नाहीत. पण मी फक्त एक मालकीण नाही, तर मुंबईची नेहमीच एक मोठी चाहती राहिली आहे. मला वाटते मुंबईची जर्सी परिधान करणे एक सन्मान आहे. मुंबईशी जोडले जाणे माझ्यासाठी एक सन्मान आणि आणि आनंदाची गोष्ट आहे. मला वाटते की, आता आपण परत जाऊ आणि कामगिरीची समीक्षा करू, यावर विचार करू. याशिवाय नीता अंबानी यांनी आगामी टी-२० विश्वचषकासाठी निवड झालेल्या आपल्या संघातल खेळाडूंनाही शुभेच्छा दिल्या.

## झ्वेरेवने कोरले अजिंक्यपदावर नाव

**। रोम । वृत्तसंस्था ।**

जर्मनीच्या ॲलेक्झँडर झ्वेरेव याने इटालियन ओपन स्पर्धेत अजिंक्यपदावर नाव कोरले. त्याने अजिंक्यपदाच्या लढतीत २४ व्या स्थानावर असलेल्या निकोलस जॅरी याच्यावर सरळ दोन सेटमध्ये विजय मिळवत झळाळता करंडक पटकावला.



ॲलेक्झँडर झ्वेरेव याला दोन वर्षांपूर्वी दुखापतीला सामोरे जावे लागले होते. त्यानंतर या पठ्ठ्याला टेनिस कोर्टवर दमदार प्रदर्शनही करता आले नाही. इटालियन ओपनचे जेतेपद त्याच्यासाठी स्पेशल ठरले आहे. आता आगामी फ्रेंच ओपन या ग्रँडस्लॅमआधी त्याचा आत्मविश्वास कमालीचा उंचावला असेल. फ्रेंच ओपन स्पर्धेसाठीच्या प्रबळ दावेदार टेनिसपटूंच्या यादीत आता त्याचाही समावेश असणार आहे. नोवाक जोकोविच व राफेल नदाल या महान खेळाडूंना सुमार फॉर्ममधून जावे लागत आहे. तसेच, यानिक सिन्नर व कार्लोस अल्काराझ या युवा टेनिसपटूंनाही दुखापतींनी घेरले आहे. त्यामुळे झ्वेरेव याच्याकडे फ्रेंच ओपन स्पर्धेमध्ये अजिंक्यपद पटकावण्याची सुवर्णसंधी असणार आहे.

दरम्यान, याआधी महिला एकेरीची अंतिम लढत पार पडली. यामध्ये इगा स्विअतेक हिने एरीना सबलेंका हिला पराभूत करीत विजेतेपदाचा मान संपादन केला होता.

## जेक फ्रेसरला ऑस्ट्रेलिया संघात स्थान

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएलच्या यंदाच्या मोसमात दिल्ली कॅपिटल्स संघासाठी मोलाची कामगिरी करणारा युवा फलंदाज जेक फ्रेसर मॅकगर्क याला ऑस्ट्रेलियाच्या टी-२० विश्वकरंडकासाठीच्या संघात स्थान मिळाले आहे. मॅकगर्क याला पर्यायी खेळाडू म्हणून संघात स्थान देण्यात आले आहे. वेस्ट इंडीज व अमेरिका येथे एक जूनपासून टी-२० विश्वकरंडकाला सुरुवात होणार आहे. ऑस्ट्रेलियन क्रिकेट निवड समितीचे प्रमुख जॉर्ज बेली यांनी टी-२० संघाची निवड केली तेव्हा पर्यायी खेळाडू म्हणून एकालाच विश्वकरंडकाला पाठवण्यात यावे, असे सुचवले होते, पण मॅकगर्क याची आयपीएलमधील फलंदाजी बघितल्यानंतर मॅथ्यू शॉर्ट याच्यासह मॅकगर्क याचीही निवड होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## मुख्य प्रशिक्षक निवडण्यात धोनीची भूमिका

**बीसीसीआयनं सोपवली मोठी जबाबदारी**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकानंतर भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांचा कार्यकाळ संपुष्टात येत आहे. बीसीसीआय राहुल द्रविडच्या जागी नवीन मुख्य प्रशिक्षकाच्या शोधात आहे. या पदासाठी अनेक दावेदारांची नावे पुढे आली होती. मात्र, अद्याप काहीही स्पष्ट झालेले नाही. आता यासंबंधीची मोठी माहिती समोर येत आहे.

वास्तविक, भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी भारताच्या मुख्य प्रशिक्षक निवड प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. द्रविडच्या जागी मुख्य प्रशिक्षक म्हणून बीसीसीआयची पसंत न्यूझीलंडचे माजी कर्णधार स्टीफन फ्लेमिंग आहेत.



परंतु, त्यांनी ही ऑफर नाकारली. आता स्टीफन फ्लेमिंग यांना पटवण्याची जबाबदारी धोनीवर आहे. स्टीफन फ्लेमिंगला पटवण्यात माही यशस्वी ठरला, तर ते भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक होणार हे जवळपास निश्चित आहे.

### ज्युनियर टेनिस अजिंक्यपद स्पर्धा

## सहा मानांकित खेळाडूंना पराभवाचा धक्का

**। कोल्हापूर । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना व कोल्हापूर जिल्हा टेनिस संघटना यांच्यावतीने आयोजित १९ व्या रमेश देसाई मेमोरियल १६ वर्षाखालील राष्ट्रीय ज्युनियर टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत मुलांच्या गटात महाराष्ट्राच्या स्वराज ढमढेरे, नील केळकर, बंगालचा संकल्प सहानी, शौनक चॅटर्जी, कर्नाटकच्या निकित कोरीशेत्रु, आंध्रप्रदेशच्या लक्ष्य चुक्का यांनी मानांकित खेळाडूंवर विजय मिळवत दिवस गाजवला.


कोल्हापूर येथील केडीएलटीए टेनिस कॉम्प्लेक्स येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत मुलांच्या गटात बिगरमानांकीत महाराष्ट्राच्या स्वराज ढमढेरेने सहाव्या मानांकित अहान शेट्टीचा टायब्रेकमध्ये ६-७(५), ६-३, ६-० असा पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदवला. महाराष्ट्राच्या नील केळकर याने तामिळनाडूच्या अकराव्या मानांकित प्रत्युश लोगनाथनचा ३-६, ७-६(३), ६-१ असा तर, पश्चिम बंगालच्या शौनक चॅटर्जीने मध्यप्रदेशच्या नवव्या मानांकित रुद्र बाथमचा ७-५, ६-२ असा पराभव करून सनसनाटी निकालाची नोंद केली.

## स्वप्नीलची संधी देण्याची विनंती

**। बंगळूरू । वृत्तसंस्था ।**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने इंडियन प्रीमीयर लीग २०२४ मध्ये शानदार पुनरागमन करत प्लेऑफमध्ये स्थान मिळवले आहे. बंगळुरूच्या या पुनरागमनात अनेक क्रिकेटपटूंचा मोलाचा वाटा राहिला, ज्यात स्वप्नील सिंगचाही समावेश आहे.

स्वप्नीलला सुरुवातीच्या ८ सामन्यात बंगळुरूने संधी दिली नव्हती. पण नवव्या सामन्यापासून तो बंगळुरूकडून खेळला, विशेषत:तो इम्पॅक्ट प्लेअर म्हणून योगदान देताना दिसला. त्याने गोलंदाजी बरोबरच फलंदाजीही योगदान दिले. स्वप्नीलचे नाव देशांतर्गत क्रिकेटमध्ये नेहमीच चर्चेत असते. त्याला २००८ मध्येच मुंबई इंडियन्सने आयपीएलमध्ये निवडलेही होते. परंतु, त्याला प्लेइंग इलेव्हनमध्ये खेळण्याची संधी मिळाली नव्हती. यानंतर त्याला



आयपीएलमध्ये पदार्पण करण्यासाठी २०१६ सालाची वाट पाहावी लागली. त्याने पंजाब किंग्सकडून कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध पदार्पण केले. त्याने पंजाब किंग्सकडून कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध पदार्पण केले. पण त्यात त्याला खास काही करता आले नाही. त्यानंतर त्याला संधी मिळाली ती लखनौ सुपर जायंट्सकडून २०२३ मध्ये त्यावेळी अँडी फ्लॉवर प्रशिक्षक होते. पण २०२४ मध्ये फ्लॉवर यांनी बंगळुरूचे प्रशिक्षकपद स्विकारले. यावेळी स्वप्नीलने त्यांना प्री-सिजन ट्रायल कॅम्पमध्ये एक शेवटची संधी देण्याची विनंती केली होती. अखेर स्वप्निलला बंगळुरूने लिलावात शेवटी २० लाखांच्या मुळ किंमतीत संघात घेतले. त्याच्या या संपूर्ण प्रवासाबाबत स्वप्निलने भाष्य केले आहे. याचा व्हिडिओही बंगळुरूने सोशल मीडियावर शेअर केला आहे. दरम्यान, त्याने सांगितले की, जर त्याला या हंगामात संधी मिळाली नसती, तर त्याने क्रिकेट सोडण्याचा विचार केला होता. तो त्याच्या प्रवासाबद्दल सांगत असताना भावूकही झाला होता.

## भारताच्या रिले संघाचे विक्रमासह सुवर्ण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताच्या मिश्र ४-४०० रिले संघाने आशियाई रिले अजिंक्यपद स्पर्धेमध्ये सोमवारी राष्ट्रीय विक्रमासह सुवर्णपदक पटकावले. मात्र, उल्लेखनीय कामगिरी केल्यानंतरही भारतीय संघाला पॅरिस ऑलिंपिकच्या पात्रतेपासून दूरच रहावे लागले. भारताच्या मिश्र संघात मुहम्मद अजमल, ज्योतीका श्रीदंडी, अमोज जेकब व शुभा व्यंकटेशन या खेळाडूंचा समावेश होता. भारताच्या मिश्र संघाने ३ मिनिटे व १४.१२ सेकंदात शर्यत पूर्ण केली व नवा राष्ट्रीय विक्रम नोंदवला. या विक्रमासह भारताच्या मिश्र संघाला सुवर्णपदकावरही हक्क सांगता आला. मात्र, पॅरिस ऑलिंपिकची पात्रता त्यांना मिळवता आली नाही. भारताच्या मिश्र रिले संघातील राजेश रमेशला दुखापत झाल्यामुळे भारतीय संघाला माघार घ्यावी लागली होती. आता भारतीय ॲथलेटिक्स संघटनेकडून भारताच्या मिश्र रिले संघासाठी पाऊल उचलण्यात येऊ शकते. पॅरिस ऑलिंपिकमध्ये पात्र ठरण्याची अंतिम तारीख ३० जून आहे. तोपर्यंत आयोजित करण्यात येत असलेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होऊन पात्रता मिळवण्यासाठी भारताचा मिश्र रिले संघ प्रयत्न करू शकतो.

## रोहितच्या आरोपांना स्टार स्पोर्ट्सचे उत्तर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

काही दिवसांपूर्वी रोहितचा एक व्हिडिओ सोशल मीडियावरती चांगलाच व्हायरल झाला होता. त्यात तो केकेआरचे प्रशिक्षक अभिषेक नायर यांच्यासोबत काही वैयक्तिक चर्चा करताना दिसत होता. आयपीएल ब्रॉडकास्टर 'स्टार स्पोर्ट्स' यांनी दाखवलेल्या या व्हिडिओमुळे विविध चर्चांना उधाण आले होते. रोहित पुढच्या हंगामात केकेआरमध्ये जाणार का? अशा चर्चा देखील सर्वत्र होऊ लागल्या होत्या. त्यामुळे रोहित खूप चिडला होता.



१९ मे रोजी रोहितने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेअर करत स्टार स्पोर्ट्सला फटकारले होते. विरोध करूनही चॅनलने त्याचा वैयक्तिक व्हिडिओ प्ले केल्याचे रोहितेने म्हटले होते.

आता यावर स्टार स्पोर्ट्सने उत्तर दिले आहे. चॅनलने एक निवेदन जारी करत म्हटले की, भारताच्या एका सीनियर खेळाडूच्या क्लिपची कालपासून सोशल मीडियावरती खूप चर्चा होत आहे. ही क्लिप १६ मे रोजी वानखेडे स्टेडियमवरची आहे. ही क्लिप सरावादरम्यान रेकॉर्ड केली होती. असे करण्यासाठी स्टार स्पोर्ट्सकडे अधिकार आहेत. व्हिडिओमध्ये एखादा सीनियर खेळाडू त्याच्या मित्रांसोबत गप्पा-गोष्टी करताना दिसतो. या व्हिडिओ क्लिपमध्ये आम्ही कोणताही ऑडिओ रेकॉर्ड केलेला नाही. तसेच, तो कोणत्याही लाईव्ह टीव्हीवरती दाखवला देखील नाही. आम्ही जगभर क्रिकेटचे प्रक्षेपण करत असताना सर्व नियमांचे पालन करतो.

## विजेतेपदाचा दुष्काळ संपवण्यासाठी सिंधू सज्ज

**मलेशिया मास्टर्स स्पर्धेत फॉर्मात येण्याची संधी**



**। क्वालालम्पूर । वृत्तसंस्था ।**

गुडघ्याच्या दुखापतीमधून बरी होत बॅडमिंटन कोर्टवर पुनरागमन करणाऱ्या पी. व्ही. सिंधूला मागील सहा स्पर्धांमध्ये प्रतिमेला साजेशी कामगिरी करता आलेली नाही. याप्रसंगी पॅरिस ऑलिंपिकआधी विजेतेपदाचा दुष्काळ संपवण्यासाठी भारताची फुलराणी सज्ज झाली असेल. मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धा मंगळवार पासून सुरू झाली आहे. महिला एकेरीत सिंधूच्या खेळाकडे तमाम बॅडमिंटनप्रेमींच्या नजरा खिळलेल्या असणार आहेत.

पी.व्ही. सिंधूने उबेर करंडक व थायलंड ओपन या दोन स्पर्धांमधून माघार घेतली. तसेच, मागील सहा स्पर्धांमध्ये तिच्याकडून प्रभावी कामगिरीही झालेली नाही. दोन स्पर्धांमध्ये तिला उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारता आली. सिंधूने शेवटचे जेतेपद २०२२ मध्ये मिळवले. सिंगापूर ओपन स्पर्धा जिंकल्यानंतर तिला अजिंक्यपदापासून दूरच राहावे लागले आहे. मागील वर्षी झालेल्या स्पेन मास्टर्स स्पर्धेची अंतिम फेरी गाठण्यात तिला यश मिळाले होते; पण त्या वेळी तिला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. दिग्गज खेळाडूंची अनुपस्थिती ॲन सी यंग, चेन यु फेई, अकाने यामागुची व कॅरोलिना मरीन या दिग्गज महिला बॅडमिंटनपटूंची अनुपस्थिती असल्यामुळे सिंधूला मलेशिया मास्टर्स स्पर्धेत फॉर्मात येण्याची संधी असणार आहे. युवा खेळाडूंविरुद्ध खेळून ती आपला फॉर्म कमवू शकणार आहे. प्रकाश पडुकोण यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे.

सिंधूसह महिला एकेरीमध्ये अश्मिता छलीहा, आकर्षी कश्यप, मालविका बन्सोड या खेळाडूंकडूनही भारतीय संघाला आशा असणार आहेत. हे सर्व खेळाडू बराच काळ आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळताना दिसत आहेत. त्यामुळे त्यांच्या खेळामध्ये सुधारणा अपेक्षित आहे.

**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)